॥ जय माता जी ॥



॥ माता बारोंडादेवी प्रसन्न ॥

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

वर्ष : १३ अंक : १८ सोमवार दि. १२ मे २०२५ ते रविवार दि. १८ मे २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## जेवणावरून दोघांमध्ये भांडण झाले दारूच्या नशेत भाऊजीला ठार केले

फोंडा/क्राईम रिपोर्टर

दारूच्या नशेत माणसाला नात्यागोत्याचा दोस्ती यारीचा विसर पडतो. फोंड्या जवळच्या शिरांतर गावात श्रीकांत उर्मेय यांच्या शेतात काम करणाऱ्या डेव्हिड आणि दीपक यांच्या बाबतीत असेच झाले. डेव्हिड हा दीपकचा मेव्हणा होता. आणि दोघेही एकत्र काम करायचे. पण दारूची नशा झाल्यावर दोघांमध्ये वाद व्हायचे. मालक श्रीकांतने अनेक वेळा त्यांना समजावले, पण ते ऐकायच्या मनस्थितीत नसायचे. एका रात्री जेवणावरून दोघांमध्ये वाद झाला, याच वादातून चिडलेल्या डेव्हिडने भाऊजी दीपक याच्यावर चाकूचे वार करून ...पान २ वर

# आदिवासी महिलेच्या अब्रुवर डाका घालायला गेला आईकडे शरीरसुख मागणारा मुलाच्या हातून मेला

बारामती (सांगवी)/क्राईम रिपोर्टर

**प्रत्येक मुलासाठी जन्मदाती आई ही पूज्यनीय असते. ज्याप्रमाणे मुलासाठी आईची काहीही करायची, कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याची तयारी असते अगदी तशीच मुलाचीही आईसाठी काहीही करायची तयारी असते. जन्म झाल्यानंतर मुलाला लहानाचे मोठे करण्याची जबाबदारी आईची असते. त्यासाठी काबाडकष्ट करून ती त्याचे संगोपन करते. त्याला चांगले शिक्षण देते. त्याच्यावर चांगले संस्कार करते. जेनेकारूम आपला मुलगा मोठा झाल्यावर तो आपला आधार बनावा, रक्षक बनावा, चांगला नोकरीधंदा करून त्याने सुखाचा संसार करावा हीच आईची अपेक्षा असते. त्यामुळे मुलगा असो किंवा मुलगी मुले मोठेपणी आपल्या आईच्या उपकारांची जाणीव ठेवतात आणि तिने जसे त्यांच्या लहानपणी त्यांना सुखात वाढवलेले असते. तसेच सुख तिच्या उतारवयात तिला देण्याचा प्रयत्न करतात. आईच्या मायेच्या पदराखाली वाढलेली मुले मोठी झाल्यावर आपल्या आईचा आधार बनतात. अशावेळी आपल्या आईला कोणी काय बोलले, तर मुलांना सहन होत नाही. कारण आई त्यांच्यासाठी सर्व काही असते. त्यामुळे आईसाठी काहीही करायची त्यांची तयारी असते. आई बरोबर एखाद्याचे भांडण झाले आणि त्या भांडणात आईची चुकी असली तरी मुलगा आईची बाजू घेवून तिच्याशी वाद घालणार्याला धडा शिकवतो. आई आणि मुलाचे असे घट्ट आणि पवित्र नाते असते. माणूस किती जरी गरीब असला तरी आईला तिच्या उतार वयात कोणत्याही गोष्टीचा त्रास होणार नाही याची सतत काळजी घेत असतो. तिला सतत जपत असतो. कुटुंबात सहसा सासू सूनेच पटत नाही. अशावेळी मुलगा आईची बाजू घेवून पत्नीला तिची जागा दाखवून देत असतो. आईवर प्रचंड प्रेम आणि श्रद्धा असलेल्या अशाच एका मजूर तरुणाने त्याच्या आईकडे शरीरसुखाची मागणी करणाऱ्याचा जीव घेतला. बारामती तालुक्यातील खंडज गावात ही घटना घडली असून पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे.**



मजुरी करणाऱ्या एका तरुणाच्या आईकडे शरीरसुखाची मागणी केल्याच्या रागातून एका ५८ वर्षीय व्यक्तीचा दगडाने ठेचून खून करून मृतदेह विहिरीत फेकल्याची धक्कादायक घटना बारामती तालुक्यातील खांडज गावात उघडकीस आली आहे. मयताचे नाव मारुती साहेबराव रोमन (वय ५८) असून, पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. ही घटना माळेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. ७ मे रोजी सकाळी खांडज शिवारातील विहिरीत एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह तरंगताना आढळला. पोलिसांना माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेतली असता मृत व्यक्तीच्या डोक्यावर व चेहऱ्यावर गंभीर इजा दिसून आली. त्याच्या गळ्यात काळ्या रंगाची साडी व त्यात दगड बांधलेले होते. मृतदेहाची ओळख शिवाजी साहेबराव रोमन यांनी त्यांचा भाऊ मारुती रोमन असल्याचे सांगून पटवून दिली.पोलीस तपासात निष्पन्न झाले की मयत मारुती रोमन यांनी मजुरी करणाऱ्या नवनाथ घोगरे यांच्या आईकडे शरीरसुखाची मागणी केली होती. ही गोष्ट मुलगा नवनाथला समजल्यावर त्याने रागात येऊन साथीदार अनिल गोविंद जाधव याच्या मदतीने मारुती यांना गोड बोलून निर्जनस्थळी नेले. तेथे डोक्यात दगड घालून खून केला. नंतर पुरावे नष्ट करण्यासाठी मृताचे कपडे काढून पेटवले व काही काळ ऊसाच्या शेतात मृतदेह लपवून ठेवला. शेवटी मृतदेहाचे हातपाय व साडीने मोठे दगड बांधून विहिरीत फेकण्यात आला.या प्रकरणी नवनाथ घोगरे (२५, रा. कार्ले भाजी, लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे) आणि अनिल जाधव (३५, रा. आंबेवाडी, ता. रोहा, जि. रायगड) या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. माळेगाव पोलिसांचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे, उपनिरीक्षक अमोल खटावकर व त्यांच्या पथकाने अत्यंत कौशल्याने तपास करून हे गुन्हेगार जेरबंद केले. या घटनेमुळे खांडज परिसरात मोठी खळबळ उडाली असून, समाजमन हादरले आहे. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# वहिनीने आपल्या चुलत दिराला पटवले पतीचा अडथळा येताच मार्गातून हटवले

कागल/क्राईम रिपोर्टर



**विवाहितांच्या अनैतिक संबंधात जेंव्हा एखाद्याचा अडसर निर्माण होतो, तेंव्हा त्याला मार्गातून हटवण्यासाठी माणूस नात्यागोत्याचाही विचार करीत नाही. कागल तालुक्यातील शिवाजी शिंदे याची पत्नी कांचन हिचे तिच्याच दिराशी अनैतिक संबंध होते. मात्र या संबंधात शिवाजी अडथला ठरत होता. त्यातच शिवाजीने फायनान्स कंपनीच्या माध्यमातून मोठी आर्थिक उलाढाल केली होती. त्यावरून पती-पत्नीत वाद सुरु होता. त्यामुळे चिडलेल्या कांचनने प्रियकर असलेल्या दिराच्या मदतीने पतीचा काटा काढला. या प्रकरणी आरोपी कांचन व तिचा चुलत दीर चंद्रकांत शिंदे यांना अटक करण्यात आली आहे.**

वडगाव (ता. कागल) येथे अनैतिक संबंधातून पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीचा खून केल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. शिवाजी बंडा शिंदे (वय ४७, रा. वडगाव) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी संशयित आरोपी कांचन शिवाजी शिंदे व चंद्रकांत धोंडीबा शिंदे (रा. वडगाव) यांना ताब्यात घेतले आहे. आरोपी चंद्रकांत शिंदे हा मृत शिवाजीचा चुलतभाऊ आहे. वडगाव फाट्याजवळ काशी नाका येथे रस्त्याच्या कडेला शिवाजी शिंदे याचा मृतदेह पहाटे फिरायला गेलेल्या नागरिकांना दिसला. ग्रामस्थ व पोलिस पाटील यांनी मुरगूड पोलिस ठाण्यास याबाबत कल्पना दिली. सुरुवातीला हा अपघात झाला असावा असे सर्वांना वाटले. पण घटनास्थळाची परिस्थिती पाहून पोलिसांनी चौकशी केली असता हा खून असल्याचे स्पष्ट झाले. मृत शिवाजी याने फायनान्स कंपनीच्या माध्यमातून मोठी आर्थिक उलाढाल केली होती. या आर्थिक देवाण-घेवाणीतून पत्नी आरोपी कांचन हिच्यासोबत त्यांचे वारंवार वाद होत होते. गुरुवारी कापशीतील कामे संपवून शिवाजी वडगावकडे गेले होते. एकादशीनिमित्त वडगाव येथील मंदिरात भजन सुरू होते त्यामुळे रात्री उशिरापर्यत ते मंदिराजवळच थांबले होते, असे ग्रामस्थांनी सांगितले. दरम्यान, गुरुवारी रात्री अकरानंतर शिवाजी हा चुलतभाऊ आरोपी चंद्रकांत याच्या गाडीवरून गेला असल्याची माहिती खबऱ्याकडून पोलिसांना मिळाली. यावरून पोलिसांनी चंद्रकांत याला ताब्यात घेत पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्हा कबूल केला. दोघांनी शिवाजीला निर्जनस्थळी नेऊन लाकडी ओंडक्याने मारहाण करून त्याचा खून केला. आरोपींनी पुरावा व ओळख नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह वडगाव येथील काशी नाका येथे रस्त्याकडेला टाकला असल्याचे पोलिसांना सांगितले. मुरगूडचे पोलिस निरीक्षक शिवाजी करे व पोलिसांनी आठ तासात खुनाचा छडा लावून आरोपी कांचन व आरोपी चंद्रकांत शिंदे यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चोरीच्या संशयावरून अपहरण केले तीन दिवस कोंडून ठेऊन ठार मारले

अथणी/क्राईम रिपोर्टर



**आजकाल मोबलिन्चींगचे प्रकार भयंकर वाढले आहेत. एखाद्या माणसाचा साधा संशय आला तरी त्याला मारहाण केली जाते. लोक त्याच्यावर तुटून पडतात. वास्तविक अशा तऱ्हेने कायदा हातात घेणे चुकीचे आहे. पण माणसाला छोट्या छोट्या गोष्टीचा राग येतो आणि याच रागातून माणूस मागचा पुढचा विचार न करता केवळ संशयावरून एखाद्यावर तुटून पडतो. अथणी जवळच्या संकोणहट्टी गावाजवळ केवळ चोरीच्या संशयावरून एकाची हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

हारुगिरी रस्त्यावर संकोणहट्टीजवळ असलेल्या एका फर्निचर दुकानासमोर चोरी करण्यास आलेल्या संशयित विकास शिवदास कोष्टी (वय १६, रा. अरळहटी, ता. अथणी) याला बेदम मारहाण करून खून केल्याची घटना उघडकीस आली. १ मे रोजी हुलागबाळी रस्त्यावर खून केल्याचे आढळून आल्यानंतर पोलिसांनी तपासचक्रे फिरवून सहा जणांना अटक केली. इतर संशयित फरारी आहेत. खुनानंतर विकास कोष्टी याला पुरावा नष्ट करण्यासाठी अज्ञातस्थळी फेकून दिले होते. पोलिसांनी तपासानंतर संशयित ...पान ६ वर

# खुनी निर्दोष सुटताच पुन्हा वाद पेटला अखेर बापाच्या हत्येचा मुलाने सूड घेतला



मयत गोपाल









जळगाव/क्राईम रिपोर्टर

**गावातील पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या बांधकामावरून सुरु झालेल्या वादात गावातील दोघांनाचा बळी जाईल असे कोणालाही वाटले नव्हते, पण सुडाचे राजकारण माणसाच्या प्राणावर बेतणारे असल्याने त्यातून कधीना कधी एखाद्याचा जीव जातो. जळगाव जिल्ह्याच्या वाकटुकी गावात पिण्याच्या पाण्याच्या टाकीवरून सरपंच ज्ञानेश्वर कोळी, मधुकर कोळी व गोपाल मालचे यांच्यात वाद झाला होता, याच वादातून ज्ञानेश्वर कोळी याची हत्या करण्यात आली होती. या हत्या प्रकरणातील आरोपी गोपाल मालचे आणि त्याचे साथीदार न्यायालयातून पुराव्याभावी निर्दोष सुटले. अर्थात न्यायलयाने त्यांना निर्दोष सोडले तरी नियती मात्र सूड घेण्यासाठी लपून बसली होती. ज्ञानेश्वरच मुलगा राहुल याने १४ वर्षांनी निर्दोष सुटलेल्यांचा सूड घेण्याचे ठरवले होते. त्यासाठी तो गोपाल मालचे याच्या मागावर होता. अखेर त्याने गोपाळला गाठले आणि साथीदारांच्या मदतीने त्याचा जीव घेवून वडिलांच्या खुनाचा बदला घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

चौदा वर्षापुर्वी गावाची सत्ता आणि गावातील पाण्याच्या टाकीच्या अपुर्ण बांधकामाच्या प्रश्नावरुन तत्कालीन सरपंच आणि प्रतिस्पर्धी गटात वाद झाला होता. या वादातून सन २०११ मधे त्यावेळी सरपंचाची हत्या झाली होती. या हत्येचा वाद न्यायालयात निकाली निघाला. सर्व मारेकरी सबळ पुराव्या अभावी निर्दोष सुटले आणि जेलमधून बाहेर आले. आपल्या बापाच्या खूनाचा बदला म्हणून मुलाने मारेकऱ्याची चौदा वर्षानंतर...पान २ वर

## दारुड्या माणसाची कोण करील कीव आई व बहिणीने घेतला मयूरचा जीव

तासगाव/क्राईम रिपोर्टर



**बिनकामाचा माणूस घरच्यांच्या डोक्याला ताप असतो. अशा स्थितीत तो जर दारू पिऊ लागला तर कुटुंबियांच्या डोक्याचा ताप आणखी वाढतो. तासगाव शहरातील मयूर माळी हा सामाजिक कार्यकर्ता असला तरी कोणताही कामधंदा करीत नव्हता. शिवाय त्याला दारूचे व्यसनही लागले होते. त्यामुळे त्याचे लग्नही होत नव्हते. याचा राग तो आपल्या आई आणि विवाहित बहिणीवर काढीत असे. त्यांना मारहाण करीत असे. अखेर या त्रासाला कंटाळून मायलेकींनी त्याचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. एके रात्री त्याने आई आणि बहिणीला दारूच्या नशेत मारहाण करताच त्यांनी मयूरला गुंगीचे औषध दिले आणि तो गुंगीत असतानाच त्याच्या डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मायलेकींना अटक केली आहे.**

तासगाव शहरातील कासार गल्ली येथे संगिता रामचंद्र माळी या मुलगा मयुर आणि मुलगी काजल याच्याबरोबर राहयला आहेत. गेल्या काही वर्षापुर्वी त्याच्या पतीचे निधन झाल्याने त्यांनी मोठ्या कष्टाने मुलाचे मुलीचे संगोपन केले आहे. त्याचा मुलगा मयुर ...पान २ वर

# चारित्र्याच्या संशयाने वेडापिसा झाला रागाच्या भरात त्याने पत्नीचा खून केला

धुळे/क्राईम रिपोर्टर



मयत सोनी



आरोपी मोहन

**संशय माणसाला नेहमीच अस्वस्थ करीत असतो. त्यातच जर संसारात संशयाने बिबा घातला तर संसार उध्वस्त व्हायला वेळ लागत नाही. नरडाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशाच एका घटनेत मनमोकळ्या स्वभावाची पत्नी सर्वांशी मिळून मिसळून वागते, लोकांशी सतत गप्पा मारते याचा तिचा पती मोहन याला वेगळाच संशय आला आणि याच संशयामुळे त्यांच्यात वाद निर्माण झाला. मोहन तीला दारू पिवून मारहाण करू लागला. शेवटी पत्नी असली तरी ती किती सहन करणार तिने पतीवर हात उचलला या गोष्टीचा मोहन याला इतका राग आला कि त्याने पत्नीचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.**

मोलमजुरी करून कष्टाचं जीवन व्यतित करणाऱ्या एका तळागाळातील कुटुंबात सोनी जन्माला आली होती. सोनी जन्मतःच दिसायला सुंदर असल्याने तिच्या आई-वडीलांनी तिचं नाव कौतुकानं सोनी असं ठेवलं होतं. कले-कलेने सोनी मोठी होत गेली, तसतशी ती अधिकच सुंदर दिसू लागली. आता तिने तारूण्यात पदार्पण केलं होतं. मुलगी वयात आली की आदिवासी समाजात तिचे लग्न करण्याची घाई होत असते. सोनी हिच्याबाबतही तसंच झालं. मुलगा अंगमेहनत करून पैसे कमावतो एवढ्याच भांडवलावर सोनीच्या आई-वडीलांनी सोन्यासारख्या लेकीचं लग्न दभाळी गावातील एका कष्टकरी कुटुंबातील मोहनशी करून दिलं. मोहनसुद्धा नावाप्रमाणे इतरांना आपल्या वागणुकीने व बोलण्याने आकर्षित करणारा होता. आपल्या पत्नीला म्हणजे सोनीलाही मोहनने आकर्षित करून घेतले होते. मुळातच सोनी सुंदर होती. त्याचबरोबर तिचं ...पान ६ वर

## आंतरजातीय 'लव्ह स्टोरी'वर पडदा पाडला बहिणीच्या प्रियकराचा भावाने काटा काढला

कराड/क्राईम रिपोर्टर



मयत रहिमतुल्ला

**प्रेम आंधळे असते ते गरिबी-श्रीमंती तसेच जातपात मनात नसते. त्यामुळे दोन वेगवेगळ्या जातीची मुले-मुली एकत्र येतात त्यांचे प्रेम जुळते आणि पुढे घरच्यांचा विरोध डावलून लग्नही करतात. पण आजही आपल्या देशात आंतरजातीय विवाहांना समाजाची मान्यता नाही. त्यामुळे असे विवाह झाल्यास सैराट सारखी हत्याकांड घडतात. कासेगाव मधील रहिमतुल्ला आणि त्याचाच मित्र राकेश पाटील याची चुलत बहिण यांचे प्रेम संबंध होते. मात्र धर्म वेगळा असल्याने राकेश आणि त्याच्या कुटुंबियांना हे प्रेम संबंध मान्य नव्हते. राकेशने अनेक वेळा रहिमतुल्ला याला माझ्या बहिणीचा नाद सोड असे सांगून पाहिले, पण तो ऐकत नव्हता. अखेर राकेशने आपल्या साथीदारांच्या मदतीने रहिमतुल्ला याचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.**

कासेगाव येथे रहिमतुल्ला सलीम आतार हा २७ वर्षीय तरूण पोस्ट ऑफिसमोर आपल्या कुटूंबियासमवेत राहयला आहे. तो मोबाईल दुरूस्तीचे काम करून आपला उदरनिर्वाह करतो. रहिमतुल्ला आतार हा मोबाईल दुरूस्तीचे काम करीत असल्याने त्याचा अनेकजणाशी संपर्क येत होता. त्यातच त्याचे गावातील एका मुलीशी ...पान ६ वर

# दारुडा पती डोकेदुखी ठरला पत्नीनेच त्याचा गळा चिरला

गडहिंग्लज/क्राईम रिपोर्टर



**एक जमाना असा होता कि पत्नीची पतीसमोर नजर उचलून बघण्याची हिम्मत नव्हती. पण आता जमाना बदलला आहे. महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. शिवाय कायद्याचेही महिलांना पाठबळ मिळत आहे. त्यामुळे महिला आता कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन करीत नाहीत. पूर्वी पतीचा मार खाणाऱ्या महिला आता पाटील मारहाण करू लागल्यात. गडहिंग्लज जवळच्या लिंगनूर येथे दारू पिऊन सतत मारहाण करणाऱ्या पतीची पत्नीने गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक केली आहे.**

दारू पिऊन सतत भांडणाऱ्या नवऱ्याच्या गळ्यावर पत्नीने रागाच्या भरात चाकूने वार केल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. रमेश रावसाहेब मोरे (वय ४०, रा. लिंगनूर कानूल, ता. गडहिंग्लज), असे मृताचे नाव आहे. प्रणिता रमेश मोरे (३५) हिला गडहिंग्लज पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना गुरुवारी उघडकीस आली. पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, लिंगनूर येथील रमेश मोरे हा गवंडीकाम करीत होता. दारूच्या व्यसनामुळे तो पत्नीकडे सतत पैसे मागत असे. अलीकडे काही कामधंदा करत नव्हता, घरी पैसेही देत नव्हता. त्यामुळे त्यांच्यात सतत भांडणे होत असत. रमेशचा लहान भाऊ उमेश हा कामानिमित्त कागलला राहतो. आई त्याच्याकडे गेली होती. अलीकडेच लग्न झालेली मुलगी सासरी असून, मुलगा केदार हा यात्रेनिमित्त करंबळीला गेला होता. गुरुवारी दुपारी बाराच्या सुमारास रमेश हा दारू पिऊन घरी आला व जेवून झोपला. दरम्यान, भांडी ...पान ६ वर

12 TO 18 MAY 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 5/11/2025 5:02 PM Page 1



पान १ वरून...

## जेवणावरून दोघांमध्ये भांडण...

त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी डेव्हिडला अटक केली आहे. फोंडयाजवळील कोडार-बेतोडा येथे शिरांतर या दुर्गम आणि डोंगराळ भागात श्रीकांत उर्मेय यांचे फार्म हाऊस आहे. या फार्म हाऊसवरती झारखंड राज्यातील डेव्हिड शिलास टोपो आणि दीपक बोल्तास तिर्की हे दोघेजण गेल्या पाच सहा महिन्यापूर्वी कामाला म्हणून आले. डेव्हिड आणि दीपक हे दोघे नात्याने मेहुणा भावोजी लागत होते. दोघेही श्रीकांत उमर्ये याच्या फार्म हाऊसवरती राखणदारी करणे, झाडांना पाणी घालणे, तसेच बागायतीची आणि गुरांची देखभाल करण्याचे काम करीत होते. श्रीकांत उर्मेय यांना त्याचे काम पसंत पडल्याने त्यांनी त्यांना योग्य त्या पगारावर कामासाठी ठेवून घेतले. ते दोघे ही तसे कष्टाळू असल्याने पडेल ते काम करून फार्म हाऊसवरील एका खोलीत राहत होते. त्या दोघांना ही दारू पिण्याची चिकन मटण खाण्याची सवय असल्याने आठवडयातून दोन तीन वेळा ते दारू मटणाची पार्टी करीत असायचे. डेव्हिड हा वयाची ४०शी पार केला असल्याने त्याला ओझे उचलण्याची कामे होत नव्हती. तर दीपक हा तरूण असल्याने तो त्याला जास्त काम सांगत असायचा. डेव्हिड टोपो याची बहिण दीपक याला दिली असल्याने ते दोघे ही नात्याने मेहुणा भावोजी लागत होते. झारखंडहून गोव्यात कामाला ते दोघे ही आल्याने दोघात तसे मैत्रीचे सबंध निर्माण झालेले होते. दोघांना ही रोज दारू पिल्याशिवाय झोप लागत नव्हती. सकाळी लवकर उठून गोराढोरांची देखभाल करीत संध्याकाळ पर्यत त्याचे काम चालूच असायचे. दोघे ही काम करीत असताना एकमेकांना कामावरून घालून पाडून बोलत असायचे. दीपक हा जरा काम चुकार करीत असायचा. त्याच्याकडून वेळेत काम कधीच पुर्ण होत नव्हते. त्यामुळे रात्री दारू प्यायला ते दोघेजण बसले की,रात्रीचे जेवण तयार कुणी करायचे यावरून वाद व्हायचा. त्या दोघात त्यांनी काम वाटून घेतल्याने रात्रीच्या जेवणाची तयारी ही दीपक याला करावी लागत असायची. जेवण तयार करण्याआधी तो नेहमी फुल्ल दारू पित असल्याने अनेकवेळा डेव्हिड हा स्वत:चे जेवण तयार करून जेवण करून झोपत होता. त्यामुळे दोघात दारू पिले की, अगदी क्षुल्लक कारणावरून वाद हाषऊन भांडणे होत होती. श्रीकांत उमर्ये यांचे फार्म हाऊस हे शिरांतर येथील दुर्गम भागात डोंगराजवळ असल्याने असापास कोणाची जास्त वस्ती नव्हती.गावात यायचे झाले तर कमीत कमी चार किमी त्यांना ये-जा करावी लागत होती. त्यामुळे त्या दोघापैकी एकटा जरी सकाळी गावात आला की,तो रात्रीच्या दारूची सोय म्हणून दोघांना लागेल तेवढी पार्सल घेऊन येत होते. दोघांना ही दारूबरोबर चिकन मटण खाण्याची सवय असल्याने त्याच्यावर ताव मारताना ते एकमेकांची चुका ही काढत होते. दारू दारू पिऊन भांडायचे आणि सकाळी उठून कामाला लागायचे असा त्याचा नित्यक्रम चालत होता. गोव्यासारख्या ठिकाणी अनेकांना किती ही दारू पिली तरी ती कमीच पडत असते अगदी तसेच दोघांचे ही झाले होते. दोघांना ही कमीत कमी दोन दोन क्वॉटर दारू लागत होती. त्यामुळे दारू कमी पडली की त्याचेत भांडणे होत होती.फार्म हाऊसचे मालक श्रीकांत उमर्ये हे त्यांना आठवढयातून एकदाच पैसे देत होते. त्यामुळे त्या दोघांची ओढाताण ही होत होती. तरी ही ते दोघे उधारी उसणवारी करून दारूची आणि जेवणाची सोय करीत होते. त्यातच त्या दोघांचे पैसे खर्च होत असल्याने गावी पैसे पाठविणे दोघांना ही जमत नव्हते.दोघे ही चिडखोर आणि भांडखोर असल्याने मारामारी करायला दोघेही मागे पुढे पाहत नव्हते. त्या दोघांची भांडणे सोडवण्यासाठी मालकांना अनेकवेळा तारेवरची कसरत करावी लागत होती. त्यांनी त्या दोघांना बऱ्याच वेळेला समजावून सांगून पाहिले होते.त्यांना कामावरून काढून टाकण्याची ही त्यांनी भिती घातली होती परंतु तरी ही त्या दोघांची भांडणे काही केल्या कमी होत नव्हती. रोजची भांडणे ही ठरलेलीच असायची. सोमवार दि.५ मे रोजी रात्री त्या दोघांनी फुल्ल दारू पिली होती. दोघांना ही नशा झाल्याने जेवण कुणी करायचे यावरून त्या दोघात वाद सुरू झाला होता. डेव्हिड याने दीपक याला आता तु जेवण कर असे सांगितले. परंतु दीपकला ही दारूची नशा फुल्ल झाली असल्याने दोघे ही मारामारी करीत एकमेकांच्या अंगावर धावून जात एकमेकांना अर्वाच्च भाषेत शिव्या देत होते. डेव्हिड याला दीपक याचा राग आला होता. आपण त्याचे मेहुणे असून आणि आपण त्याच्यापेक्षा ही वयाने मोठे असून देखील दीपक हा आपल्याला शिव्या देत असल्याचे बघून त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. त्याला ही जास्तच दारू झालेली होती.तो ही दारूच्या नशेत झिंगत होता.त्यातून ही डेव्हिडकडून मार खावून कसे तरी जेवण बनविले होते. परंतु डेव्हिडच्या मनातील राग अजून शांत झाला नव्हता.दीपकने त्याला जेवणाचे ताट तयार करून दिले आणि जेवून घे असे सांगितले परंतु तरी ही तो जेवायला तयार होईना त्याच्या मनातील राग जाईना म्हणून दीपक परत त्याच्याबरोबर भांडण काढू लागला. बघता बघता त्या दोघांती भांडणे वाढली. दोघे ही परत एकमेकांच्या अंगावर जात होते.त्यातच डेव्हिड टोपो याने आपल्या खिशातील चाकू काढला आणि दीपक याच्या पोटात, हातावर आणि मानेवर सपासप असे वार केले. त्यासरशी ओरडत दीपक हा रक्ताच्या थारोळयात पडला. त्याच जागीच मृत्यु झाला होता. दीपकचा आपल्या हातून खून झाला असल्याचे बघून डेव्हिड हा शांत झाला.त्याने आपल्या मोबाईलवरून या घटनेची माहिती मालक श्रीकांत उमर्ये यांना दिली. या घटनेची माहिती मिळताच ते तातडीने बेतोडा येथून आपल्या फार्म हाऊसवर आले. तेथे रक्ताच्या थारोळ्यात दीपक तिर्के हा पडला होता. तर बाजुलाच खिन्न मनाने डेव्हिड टोपो हा हातात रक्ताने माखलेला चाकू घेऊन बसला होता. बाजुलाच जेवणाचे अर्धवट ताट, दारूचे ग्लास आणि बाटल्या ही पडल्या होत्या. मालक श्रीकांत उमर्ये यांनी लागलीच या घटनेची माहिती फोंडा पोलीसांना दिली. साधरणता रात्रीचे १०.३० वाजले होते. घटनास्थळी फोंडा पोलीस स्टेशनेचे पोलीस निरी. राघोबा गावडे यांनी आपल्या सहकार्यासह भेट दिली. घटनास्थळावरील परिस्थीतीची पाहणी करून त्यांनी या घटनेची माहिती आपल्या वरिष्टांना दिली. त्यावेळी घटनास्थळी पोलीस उपाधिक्षक शिवराम वायंगणकर यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेऊन तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना दिल्या. घटनास्थळाचा पंचनामा फोंडा पोलीसांनी करून उतरीय तपासणीसाठी फोंडा येथील सरकारी रुग्णालयात मृतदेह पाठवून दिला. पोलीसानी या घटनेची माहिती फार्म हाऊसचे मालक श्रीकांत उमर्ये याच्याकडून घेऊन तशी फिर्याद त्यांनी त्याच्याकडून घेतली. या घटनेतील संशयीत डेव्हिड टोपो हा घटनेनंतर घटनास्थळावरून पळून जाण्याच्या तयारीत होता. परंतु मालक श्रीकांत उमर्ये याच्या सतर्कतेमुळे त्याचा तो डाव फसला. फोंडा पोलीसांनी डेव्हिड टोपो याला ताब्यात घेऊन फोंडा पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता. तो दारूच्या नशेत असल्याने पोलीसांना तो उलट सुलट उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविला असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलिसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी श्रीकांत उमर्ये यांच्या फिर्यादीवरून दीपक बोल्तास तिर्की (वय २७) याच्या खून प्रकरणी त्याचा मेहुणा डेव्हिड शिलास टोपो (वय४०) दोघे रा.झारखंड सध्या गोवा फोंडा याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. डेव्हिड टोपो याला पोलीसांनी फोंडा येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने त्याला १० दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला.या घटनेचा पुढील तपास पो.निरी. राघोबा गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## खुनी निर्दोष सुटताच पुन्हा वाद...

गोळ्या झाडून हत्या केली. खून का बदला खून अशी फिल्मी स्टाईल हत्या २२ एप्रिलच्या रात्री पावणे आठ वाजेच्या सुमारास धरणगाव तालुक्यात घडली. धरणगाव तालुक्यातील सन २०११ च्या आणि आता सन २०२५ च्या घटनेचा लेखाजोखा पुढीलप्रमाणे. साधारण सन २००४ चा तो काळ असावा. या काळात धरणगाव तालुक्यातील वाकटूकी या गावी ज्ञानेश्वर शंकर सावंत हा उमदा तरुण रहात होता. ऐन तारुण्याचा काळात ज्ञानेश्वर सावंत (कोळी) हा तरुण वाकटुकी गावच्या ग्रामपंचायत निवडणूकीत विजयी झाला. सरपंचपदाची माळ त्याच्या गळ्यात पडली. अंगी तारुण्याचा जोश असलेला ज्ञानेश्वर वाकटूकी गावच्या सरपंचपदी विराजमान झाल्याने त्याचा जल्लोषात सत्कार झाला. त्याच्या घरी उत्साहाचे वातावरण होते. सरपंच असलेल्या ज्ञानेश्वर सावंत याच्या सरपंचपदाच्या कार्यकाळात गावातील पाण्याच्या टाकीचे बांधकाम मजुर झाले. पाण्याच्या टाकीमुळे गावकऱ्यांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार होता. मात्र काही कारणास्तव ते काम रखडले. ते बांधकाम अपुर्ण राहिले. त्यानंतर साधारण सात ते आठ वर्षाचा कालावधी भरकन निघून गेला. पाण्याच्या टाकीचे बांधकाम अपुर्णच राहिले. दरम्यानच्या कालावधीत ज्ञानेश्वर यास ठाणे महानगरपालिकेत चालक पदावर नोकरी मिळाली. त्यामुळे आपल्या जीवनाची नव्याने सुरुवात करण्यासाठी ज्ञानेश्वरने ठाणे महानगर पालिकेत चालक पदाची नोकरी स्विकारली. मोठ्या मुलाला अंजनविहीरे या गावी दहावीचे शिक्षण घेण्यासाठी गावाकडेच ठेऊन त्याने पत्नी व लहान मुलगा अशा दोघांना सोबत घेत पनवेल गाठले. तो पत्नी व लहान मुलगा यांच्यासह पनवेल येथे राहू लागला आणि ठाणे मनपात चालकाची नोकरी करु लागला. दिवसामागून दिवस जात होते. काळ पुढे पुढे सरकत होता. मात्र त्याच्या वाकटुकी गावातील सरपंच पदाच्या कालावधीतील पाण्याच्या टाकीचे बांधकाम अपुर्णच राहिले होते. त्यानंतर काळ बदलला. ग्रामपंचायतीच्या राजकारणात सत्तापालट झाला. ज्ञानेश्वर सावंत याच्या काळातील समिती बदलली. मधुकर अर्जुन कोळी याच्या अधिपत्याखाली नविन समिती गठीत झाली. ज्ञानेश्वर कोळी याच्या कार्यकाळातील पाण्याच्या टाकीचे बांधकाम अपुर्ण असल्याने नव्याने गठीत झालेली समिती त्याच्यावर नाराज होती. ज्ञानेश्वर (सावंत) कोळी ठाणे येथून गावी वाकटुकी येथे आला म्हणजे नव्या समितीचे सदस्य त्याच्याशी वाद घालत होते. बघता बघता सन २०११ चा काळ सुरु झाला. ज्ञानेश्वर कोळी याने त्याच्या सरपंच पदाच्या कार्यकाळातील पाण्याच्या टाकीचे अपुर्ण बांधकाम पुर्ण करुन द्यावे यासाठी त्याच्यामागे तगादा सुरु होता. ज्ञानेश्वर कोळी आणि मधुकर कोळी यांच्यात पाण्याच्या टाकीच्या बांधकामावरुन संघर्ष सुरु होता. दोघांमधील वाद शिगेला पोहोचला होता. ज्ञानेश्वर सांवत (कोळी) हा पाण्याच्या टाकीचे काम करुन देण्यास तयार होता. मात्र पाण्याच्या टाकीच्या कामाचा ठेका आपल्याला मिळावा असा सरपंच मधुकर कोळी, उप सरपंच गोपाळ सोमा भिलआणि त्यांच्या समर्थकांचा सुर होता असे म्हटले जाते. एकंदरीत या विषयावरुन दोन गटातील वाद शमण्याची चिन्हे दिसत नव्हती. २० सप्टेबर २०११ रोजी माजी सरपंच ज्ञानेश्वर सावंत हा पत्नी आणि लहान मुलासह वाकटुकी गावी सुटीवर आला होता. आल्यानंतर नेहमीप्रमाणे त्याचा आणि विद्यमान सरपंच मधुकर कोळी, उप सरपंच गोपाल भिल यांच्यात वादाची ठिणगी पडली. २१ सप्टेबर २०११ रोजी पाण्याच्या टाकीच्या बांधकामाची कागदपत्रे घेऊन ज्ञानेश्वर सावंत, मधुकर अर्जुनकोळी आणि उप सरपंच गोपाळ सोमा भिल असे सर्वजण जळगाव येथे गेले. रात्रीचा एक वाजला तरी देखील ज्ञानेश्वर घरी आला नाही. त्यामुळे साहजीकच त्याची पत्नी काळजीत पडली. तिने पती ज्ञानेश्वर यास फोन करुन तो कुठे आहे याची विचारणा केली. त्यावेळी तिला पती ज्ञानेश्वर आणि मधुकर कोळी व गोपाल भिल यांच्यात जोरजोरात वाद सुरु असल्याचे ऐकू आले. त्यामुळे तिने लहान दिर नामदेव यास त्याचा शोध घेण्याकामी रवाना केले. त्या रात्री नामदेव याने त्याच्या निवडक नातेवाईकांसह ज्ञानेश्वरचा शोध घेत त्याला सुखरुप घरी परत आणले. दुसऱ्या दिवशी २२ सप्टेबर २०११ रोजी भल्या पहाटे या वादातून ज्ञानेश्वर सावंत याच्या खूनाची घटना घडली. सकाळी सहा वाजेच्या सुमारास ज्ञानेश्वर हा घरानजीक एका टपरीजवळ उभा होता. त्याच वेळी बाहेर मोठमोठ्याने ओरडण्याचा आवाज येण्यास सुरुवात झाली. आवाजाच्या दिशेने ज्ञानेश्वरच्या घरातील सर्व सदस्य बाहेर पळत आले. त्यावेळी तत्कालीन उपसरपंच गोपाल सोमा भिलयांच्यासह श्रीराम सोमा भिल, विनोद सोमा भिल, मुलचंद आत्माराम भिल, दिलीप भिल, सोमा बुधा भिल असे सामुहिकपणे उभे होते. गोपाळच्या हातात सुरीसारखे हत्यार तर श्रीरामच्या हातामध्ये बल्लम होता. इतर सर्वाच्या हातात काठ्या होत्या.पाण्याच्या टाकीचे काम आम्हीच करु असे आम्हाला मधुकर कोळी याने सांगितले असल्याचे सर्वजण ज्ञानेश्वर यास सांगून जीवे मारण्याचा दम देत होते. श्रीराम व विनोद या दोघांनी ज्ञानेश्वरला पकडून ठेवले आणि त्याच वेळी गोपाल सोमा भिल याने ज्ञानेश्वरच्या छातीवर सुरीसारख्या हत्याराने वार केले. ज्ञानेश्वर याच्यावरील जीवघेणा हल्ला रोखण्यासाठी त्याचे वडील, बहीण व भाऊ असे सर्वजण त्याच्या मदतीसाठी धावून आले. त्यावेळी विनोद कोळी याने त्यांच्यावर काठीने हल्ला केला. या जीवघेण्या हल्ल्यात ज्ञानेश्वर मात्र जीवानिशी गेला. ज्ञानेश्वरच्या मृत्युप्रकरणी त्याचा लहान भाऊ नामदेव उर्फ तानकु शंकर सावंत (कोळी) याने दिलेल्या फिर्यादीनुसार त्यावेळी धरणगाव पोलिस स्टेशनला खूनाच गुन्हा दाखल करण्यात आला. मधुकर अर्जुन कोळी, गोपाल सोमा भिल (मालचे), श्रीराम सोमा भिल, विनोद सोमा भिल, मुलचंद आत्माराम भिल, दिलीप महारु भिल, सोमा बुधा भिल अशा सर्व संशयितांविरुद्ध हा गुन्हा गु.र.नं. १८९/२०११ भा.द.वि. ३०२, ३२४, १४३, १४७, १४८, १४९, ३२३, ५०४ नुसार दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास धरणगाव पोलिस स्टेशनचे तत्कालीन पोलिस निरीक्षक (सध्या माहुर जिल्हा नांदेड उप विभागाचे डिवायएसपी) सिनगारे यांनी सुरु केला होता. ३० नोव्हेंबर २०११ रोजी या गुन्ह्याचे आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. ४ मे २०१३ रोजी या खून खटल्याचा निकाल लागला. हा गुन्हा नाशाबीत झाला. सबळ पुराव्या अभावी या गुन्ह्यातील सर्व संशयीत निर्दोष होत गुन्ह्यातून बाहेर आले. आपला बाप ज्ञानेश्वर सावंत याला जीवानिशी ठार करणारा तत्कालीन उप सरपंच गोपाळ सोमा भिल (मालचे) हा निर्दोषमुक्त झाल्याचा राग राहुल ज्ञानेश्वर सावंत (कोळी) याच्या मनात निर्माण झाला. गुन्हा घडला त्यावेळी राहुल वयाने लहान होता. मात्र जसजसा तो तरुण होत गेला तसतसा त्याच्या मनातील गोपाळ भिल (मालचे) याच्याविषयीचा राग उफाळत गेला. दिवसामागून दिवस पुढे सरकत होते. काळ झपाट्याने पुढे जात होता. ज्ञानेश्वरचा मुलगा राहुल आता तरुण झाला होता. राहुलच्या मनात आपल्याविषयी राग असल्याची कुणकुण गोपाल मालचे (भिल) यास लागली होती. तो कधीही आपल्याला एकट्यात गाठू शकतो हे गोपाल जाणून होता. त्यामुळे गोपाल मालचे व त्याचा भाऊ विनोद सोमा मालचे हे दोघे भाऊ आपल्या परिवारासह चाळीसगाव तालुक्यातील कळमडू या गावी राहण्यास निघून गेले होते. मात्र धरणगाव तालुक्यातील वाकटुकी येथे मालचे परिवाराची शेती असल्यामुळे त्यांना कामानिमीत्त वाकटुकी येथे येणे चुकत नव्हते. गेल्या तेरा वर्षापासून गोपाल मालचे आणि विनोद मालचे या दोघा भावांचा परिवार चाळीसगाव तालुक्यातील कळमडू येथे रहात होता. शेतीची कामे पुर्ण होत नसल्याने गोपाल सोमा मालचे हा गेल्या एक महिन्यापासून त्याच्या परिवारासह वाकटुकी ऐवजी धरणगाव शहरात भाड्याने राहण्यास आला होता. तो दररोज धरणगाव-वाकटुकी दरम्यान प्रवास करुन शेतीची कामे बघत होता. अखेर बरोबर चौदा वर्षानी गोपाल यास राहुलच्या रुपात काळाने गाठले. राहुलचे वडील ज्ञानेश्वर यांचा खून झाला ती तारीख २२ होती. ज्ञानेश्वर सावंत यांचा मारेकरी गोपाल यास काळरुपी राहुलने गाठले ती तारीख देखील २२ निघाली. २२ एप्रिल २०२५ हा गोपालच्या जीवनातील अखेरचा दिवस उजाडला. या दिवशी रात्री साडे सात वाजेच्या सुमारास विहीर फाट्यानजीक गोपाल मालचे हा एकटा उभा होता. त्या ठिकाणी गोपाल एकटाच आपल्या तावडीत सापडल्याचे बघून राहुलसह वाकटुकी गावातील त्याचे सहा ते सात साथीदार त्याच्या सांगण्यावरुन सामुहिकपणे एकत्र आले. आपल्या मागावर आपल्या जीवावर उठण्यासाठी राहुल आणि त्याचे साथीदार उभे असल्यामुळे गोपाल मनातून घाबरला. चौदा वर्षापुर्वी राहुलचे वडील ज्ञानेश्वर सावंत याच्यावर धारदार शस्त्राचे घाव घालतांना गोपालचे हात थरथरले नव्हते. मात्र आज आपल्या समोर आपल्याला मारण्यासाठी उभा असलेला समुह बघून गोपालचे हात थरथर कापू लागले. गोपालने भयभीत होत घरी पत्नीला फोन करुन घटनेची कल्पना दिली. त्यावेळी त्याला पत्नीने पलीकडून फोनवर सांगितले की तुम्ही त्या ठिकाणी थांबू नका. मी खामखेडा येथे निघून जातो असे गोपालने फोनवर पत्नीला सांगितले. गोपाल एकटाच त्याच्या ताब्यातील कारने जात असल्याचे बघून राहुलने त्याचा सिनेस्टाईल पाठलाग सुरु केला. त्याची गाडी अडवून त्यालाबाहेर येण्यास भाग पाडले. गोपाल बाहेर येताच राहुलने आपल्या ताब्यातील गावठी कट्ट्याने गोपालच्या कपाळावर निशाना साधला. गावठी पिस्टलचे सलग दोन ते तिन फायर झाल्याने गोपाळ त्याच्या कारजवळ रक्ताच्या थारोळ्यात पडला. चौदा वर्षापुर्वी ज्ञानेश्वरचा खून करणारा आज त्याच्याच मुलाच्या हातून रक्ताच्या थारोळ्यात मृत्युमुखी पडला होता. ज्या दिवशी ज्ञानेश्वरचा मृत्यु झाला ती तारीख २२ सप्टेबर २०११ आणि वेळ सकाळची होती. राहुलच्या हातून त्याच्या वडीलांची हत्या करणारा गोपाल याचा खून झाला ती तारीख देखील २२ होती. मात्र महिना आणि वेळ यात फरक होता. गोपलची हत्या केल्यानंतर राहुल स्वत:हून धरणगाव पोलिस स्टेशनला हजर झाला. घडलेली घटना आणि गुन्हा त्याने कबुल केला. आपण गोपालची हत्या का केली याचा देखील त्याने खुलासा केला. आपल्या बापाचा मारेकरी खून खटल्यातून निर्दोष सुटल्याचा राग मनात ठेवत आपण हा खून केल्याचे त्याने कबुल केले. न्यायदेवतेच्या डोळ्यावर पट्टी बांधलेली असते. न्यायदेवता फक्त सबळ पुरावे बघते. या सबळ पुराव्या अभावी राहुलचे वडील ज्ञानेश्वर यांचा मुख्य मारेकरी आणी त्याचे सर्व साथीदार निर्दोष सुटून बाहेर आले होते. घटनेची माहिती समजताच धरणगाव पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक पवन देसले व त्यांचे सहकारी सहायक पोलिस निरीक्षक निलेश नानाजी वाघ, हे.कॉ. महेंद्र बागुल, नितीन पाटील, राजेंद्र कोळीआदींनी घटनास्थळी धाव घेत पुढील कारवाईसह तपास सुरु केला. मयत गोपाल सोमा मालचे याचा भाऊ विनोद सोमा मालचे याने दिलेल्या फिर्यादीनुसार या घटने प्रकरणी धरणगाव पोलिस स्टेशनला संशयीत राहुल ज्ञानेश्वर सावंत (कोळी) याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.नं. १५३/२५ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०३ (१), शस्त्र अधिनियम ३, २५ नुसार दाखल गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक पवन देसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक निलेश वाघ करत आहेत.

## दारुड्या माणसाची कोण करील ...

हा ३० वर्षाचा असून तो अद्याप अविवाहित आहे. गेल्या चार पाच वर्षापासून त्याचे लग्न जमविण्याचा प्रयत्न पाहुण्याच्याकडून गेला जात होता परंतु काही केल्या त्याचे लग्न जमत नव्हते. मयुर तसा सामजिक कार्यात नेहमी अग्रेसर असल्याने दोस्ती फांऊडेशनच्या माध्यमातून त्याने तासगाव शहरात अनेक वेगवेगळे समाज उपयोगी कार्यक्रम राबविले आहेत.त्यामुळे तो आपल्या मित्र परिवारात चांगलाच लोकप्रिय होता. परंतु ही गोष्ट त्याचे लग्न जमविताना उपयोगी पडत नव्हती. त्यातच त्याचेकडे अदयाप कोणताही कामधंदा नव्हता. त्यामुळे मुली सहसा तयार होत नव्हत्या. कुठून तरी कसे तरी त्याचे लग्न व्हावे अशी त्याच्या आईची इच्छा होती. परंतु त्यांची ती इच्छा काही केल्या पुर्ण होत नव्हती. त्या मयुराला काही तरी कामधंदा कर चांगले चार पैसे कमव असे सांगत होत्या. परंतु तो कोणताही कामधंदा करायला तयार नव्हता. त्यामुळे घरात रोज भांडणे होऊ लागली होती. हल्ली तो मित्रांच्या बरोबर रोज दारू पिऊन घरी येत होता. त्यामुळे घरात कोणत्या ना कोणत्या कारणातून माय लेकाची भांडणे होत होती. दारू पिऊन आल्यावर तो आई बहिण या दोघींना तो घाणेरडया शिव्या देत त्यांना मारहाण करीत होता.त्याच्या घरी हा रोजचा तमाशा होता. कासार गल्लीतील त्याचे शेजारी ही त्याची रोजची भांडणे ऐकून कंटाळलेले होते. मयुर याचा स्वाभाव हा रागीट आणि तापट होता. हातात सापडेल त्या वस्तुने तो आई बहिण यांना मारहाण करीत होता. शेजाऱ्यांनी पै-पाहुण्यांनी त्याला किती जरी समजावून सांगितले तरी तो कोणाचे काही ऐकत नव्हता. दारू पिऊन आला की त्याच्यातील शैतान जागा होत होता. लहान मोठे तो काही म्हणत नव्हता. जन्म दिलेल्या आईला आणि रक्ताचे नाते असणाऱ्या बहिणाला तो घाणेरडया आणि अर्वाच्च भाषेत शिव्या देत मारहाण करून तुमच्यामुळे माझे लग्न जमेना असे म्हणत त्याच्यावर राग काढत होता. खरे तर त्याच्या दारू पिण्याच्या व्यसनाने आणि तो कोणताही कामधंदा करीत नसल्याने त्याचे लग्न जमत नव्हते. पण तो ही गोष्ट मान्य करीत नव्हता. त्याला आपल्या घरात आपल्या बहिणीचे राहणे खपत नव्हते. काजलचे लग्न झालेले होते परंतु तिचे तिच्या नवऱ्याशी पटत नसल्याने ती नवऱ्याला सोडून आपल्या माहेरी तासगाव येथे राहत होती. लग्न करून ही ती तिच्या सासरी न जाता आपल्या येथे राहते आणि तिच्या राहण्याला आपल्या आईची फुस आहे हे मयुरला पटत नव्हते. या दोघीच्या मुळे कदाचित आपले लग्न जमत नसावे असे त्याच्या मनात येत होते. त्यामुळे भांडणात तो याचा राग त्या दोघींच्यावर काढत असावा हे ही त्याच्या भांडणामागील एक कारण असावे असे शेजाऱ्यातून ऐकायला मिळत होते. खरे तर अलिकडे त्याच्या भांडणाला अंत राहयला नव्हता. त्या दोघी ही त्याचेवर चिडत होत्या. त्याला शिव्या शाप देत होत्या. कशाला माझ्या पोटी जन्माला आला आहेस असे संगिता माळी या त्याला बडबडत होत्या.तो काही सुधारण्याची चिन्हे दिसत नव्हती. दिवसे दिवस त्याच्या वागण्यात तापटपणा वाढतच चालला होता. त्या दोघींना ही त्याचे काय करायचे असा प्रश्न पडला होता. त्याच्या रोजच्या भांडणाला मारहाणीला आणि शिव्या देण्याला त्या इतक्या वैतगलेल्या होत्या की, त्याच्या नरडीचा घोट घ्यावा आणि त्याला कायमचा संपवून टाकावे असे त्या दोघींना ही वाटत होते. त्यातूनच त्या दोघी ही त्याला कायमचा धडा शिकविण्याची संधी शोधत होत्या. पोटचा गोळा पण कसा त्रास सहन करायचा आणि किती सहन करायचा असा प्रश्न त्या दोघींना ही पडला होता. परंतु यातून काही तरी मार्ग हा काढलाच पाहिजे याचा त्या विचार करीत होत्या. शुक्रवार दि.२ मे २०२५ रोजी रात्री नेहमीप्रमाणे मयुर हा दारू पिऊन घरी आला. दारूच्या नशेत त्याने कशावरून तरी कुसपट उकरून काढले आणि त्या दोघींना मारहाण करीत शिवी गाळ करू लागला. त्या दोघींना ही त्याचा इतका राग आला होता की. तो दारूच्या नशेत असल्याने त्याला काही समजणार नाही अशा विचारात त्याची बहिण काजल हिने त्याच्या जेवणात आणि पिण्याच्या पाण्यात जायफळची पावडर मिसळली. तो पाणी पिल्यानंतर आणि जेवल्यानंतर तसाच गाढ झोपला गेला. तो बहुदा बेशुध्द पडला असेल याची त्या दोघींनी खात्री करून घेतली. अगोदरच त्याच्या भांडणाने त्या वैतागलेल्या होत्या. त्यातच त्याने दारूच्या नशेत त्या दोघींना ही आईवरून घाणेरडया शिव्या दिल्या होत्या. याचा राग त्या दोघींच्या मनात धुसमसत होता.दारूच्या नशेत त्याने त्या दोघींना ही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याने याला आता संपवायचेच असे म्हणत काजल हिने बाहेरून एक लहान आणि मोठा दगड आणला. रात्रीचे ९.३० वाजले असतील गल्लीत सगळीकडे सामसुम होत आली होती. मयुर हा बेशुध्द अवस्थेत गाढ झोपला असल्याची खात्री झाल्यावर संगिता माळी यांनी मयुरच्या डोक्यात दोनदा लहान मोठा दगड घातला. त्यासरशी त्याच्या डोक्याला मोठी जखम होऊन मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाला.त्याच्या डोक्यात दगड घालत असताना चुकून तो दगड त्याच्या डाव्या डोळ्याच्या भुईजवळ लागला असल्याने तेथे ही मोठी जखम झालेली होती. पाण्यात आणि जेवणात गुंगीचे औषध मिसळले असल्याने त्याच्या नाका तोंडातून फेस ही आलेला होता. त्या दोघीनी त्याच्या डोक्यात दगड घातला असल्याने खरे तर त्याचा जागीच मृत्यु झालेला होता. आता त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची याचा त्या दोघी विचार करीत असताना त्यांनी घरातील त्याचे कपडे घेऊन त्याच्या अंगावर टाकले आणि त्या कपडयांना त्यांनी पेटवून दिले. जेणेकरून त्या आगीत जळून खाक होईल अशी खात्री त्यांना होत होती. त्याचे कपडे पेटवून दिल्यावर धुराचा लोळ घरात पसरू लागला. तशा त्या दोघी बोंब मारत घराच्या बाहेर आल्या. त्यांच्या बोंब मारण्याने शेजारचे लोक जमा झाले. त्या दोघीनी ही शेजाऱ्यांना सांगितले की दारूच्या नशेत भांडणात मयुरने स्वत:ला पेटवून घेतले आहे. ही आग संपुर्ण घरभर पसरू लागल्यावर शेजाऱ्यांनी तासगाव नगरपालिकेच्या अग्नीशमन विभागाला याची माहिती दिली. काही वेळातच अग्नी शमनच्या दोन गाडया आल्या. त्यांनी ती आग आटोक्यात आणली.त्यावेळी शेजाऱ्यांनी घरात जावून पाहिले तर मुयर हा गंभीर रित्या भाजला होता. त्याला शेजाऱ्यांनी तासगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्याला तपासले असता त्याच्या डोक्याला मोठी जखम आणि तोंडाला आणि नाकाला फेस आल्याचे दिसत असल्याने त्यांना शंका आली. डॉक्टरांनी याची माहिती तासगाव शहर पोलीसांना दिल्यावर पोलीस ही ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले. त्यांनी मृतदेहाची पाहणी केली असता त्यांना ही शंका आल्याने त्यांनी मृतदेहाचे पोस्टमार्टम ग्रामीण रुग्णालयात करण्यास सांगितले. पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये डोक्यात जड वस्तुने प्रहार केल्याचे आणि पोटात गुंगीचे औषध गेल्याने मृत्यु असा उल्लेख होता. यावरून पोलीसांनी मयत मयुर माळी याची आई आणि बहिण यांना ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्या दोघी ही पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होत्या. महिला पोलीसाकडून त्यांना पोलीसीखाक्या दाखविला असता त्या दोघींनी ही आपला गुन्हा मान्य करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी कासार गल्ली येथील त्याच्या घरी जावून पाहिले असता तेथे त्यांना घटनास्थळी रक्ताने माखलेले दोन दगड, पाणी मिश्रीत रक्त आणि जळालेले कपडे पोलीसांना मिळून आले. पंचनामा करून पोलीसांनी या वस्तु जप्त केल्या. या घटनेची फिर्याद पोलीस उप.निरी.विनय गोडसे यांनी स्वत:हून पोलीस ठाण्यात दिली. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी मयुर रामचंद्र माळी (३०) रा.कासार गल्ली तासगाव याचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी त्याची आई संगिता रामचंद्र माळी (५०) बहिण काजल रामचंद्र माळी (२५) रा.दोघी ही कासार गल्ली तासगाव याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. शनिवारी पोलीसांनी या दोघींना ही तासगाव येथील कोर्टात हजर केले असता मा.न्यायालयाने या दोघींना ही तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा पुढील तपास तासगाव पोलीस स्टेशनचे पो.उप.निरी. विनय गोडसे हे करीत आहेत. मयुर याचा खुन त्याच्या आई आणि बहिणीने केवळ तो त्यांना त्रास देत असल्याच्या कारणातून केला की, त्याला अन्य कोणते कारण आहे याचा शोध पोलीस घेत आहेत. कौटुंबिक वाद हा विकोपाला गेला की त्यातून भांडणे मारामारी होत असतात परंतु जन्मदात्या आईने आणि रक्ताची बहिण असणाऱ्या या दोघींनी ही इतके टोकाचे पाऊल उचलण्यामागे नक्कीच दुसरे काही तरी कारण असावे अशी ही शक्यता पोलीस तपासातून व्यक्त होत आहे. परंतु प्राथमिक दृष्टया त्या दोघींनी ही मुयर हा आपल्याला त्रास देत असल्याने त्याला मारून टाकल्याचे पोलीसांना सांगितले आहे.

# मांडवा गावातील आदिवासी कुटुंबांना पाणी टंचाईच्या झळा



**वाडा/प्रतिनिधी**

जलजीवन मिशन योजना यशस्वीपणे राबविण्यात आली असती तर निश्चितच वाडा तालुक्यातील पाणीटंचाई संपुष्टात आली असती मात्र प्रशासनाच्या थंड भूमिकेमुळे लोकांच्या नशिबी आजही वणवण आहे. मांडवा गावातील जलजीवन योजना अडचणीत असून गावातील बोअरवेल मध्ये खडखडाट असल्याने आदिवासींच्या नशिबी पाण्यासाठी संघर्ष उभा राहिला आहे. शहराच्या जवळ असलेल्या गावात ही अवस्था आहे तर ग्रामीण भागात लोकांचे जीवन किती भीषण असेल याची कल्पना न केलेली बरी आहे. वाडा - खोडाळा या मार्गावर पाचशे ते सहाशे लोक वस्तीचे मांडवा हे गाव असून या गावात जलजीवन मिशन योजनेतून ९४ लाखांचा निधी खर्चून योजना मंजूर आहे. योजनेत मात्र अनेक त्रुटी असून कधी विजेचा लपंडाव तर कधी कमी दाबाची समस्या लोकांना पाणी मात्र पिऊ देत नाही. गावातील प्रतिष्ठित व्यक्तींकडे खाजगी बोअरवेल असल्याने कुणीही याविरोधात बोलायला तयार नाही मात्र गोरगरिब आदिवासींना याचा मोठा फटका सहन करावा लागत आहे. गावातील बोअरवेल कोरडी पडल्याने लोकांचा एकमेव आधार बंद झाला असून जवळपास २५० लोकवस्तीचे पिण्याच्या पाण्यासाठी प्रचंड हाल होताना दिसत आहेत. एका संस्थेने खोदून दिलेल्या बोअरवेलवर सायंकाळी पाणी भरायला मोठी गर्दी होत असून वीज पुरवठा खंडित झाल्यास तोही आधार स्थगित होत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. पाण्यासाठी उभ्या असलेल्या या अडचणी तात्काळ सोडवून आम्हाला पाणी द्या अशी मागणी लोकांनी केली असून याबाबत अडचणी सोडविण्यासाठी पाणीपुरवठा विभाग योग्य ती कार्यवाही करील असे पंचायत समिती विभागाने सांगितले. गावात नवनवीन बोअरवेल खोदल्या जात असल्याने सार्वजनिक बोअरवेलने तळ गाठला आहे, संस्थेकडून खोदलेल्या बोअरवेलमधून पाणी लोकांना उपलब्ध करून दिले जात असून तशीच परिस्थिती उभी राहिली तर टँकरची व्यवस्था देखील केली जाईल असे उपसरपंच नंदेश नडगे यांनी सांगितले.

# रेल्वे मोटरमनच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला!

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

रेल्वे रुळावर लाकडी पेट्या ठेवून घातपात घडविण्याचा गुरुवारी रात्री प्रयत्न करण्यात आल्याची घटना मिरा रोड येथे उघडकीस आली. हा प्रकार मोटरमनच्या लक्षात आल्यानंतर त्याने प्रसंगावधान दाखवून लोकल थांबवली आणि मोठा अनर्थ टळला. खोडसाळपणे रुळावर या लाकडी पेट्या ठेवण्यात आल्याचे रेल्वे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी वसई रेल्वे पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पश्चिम रेल्वेची एक लोकल गुरूवारी रात्री विरारहून चर्चगेटच्या दिशेने निघाली होती. मिरा रोड आणि भाईंदर रेल्वे स्थानकांदरम्यान रुळावर पेट्या ठेवल्याचे रात्री ९,३० च्या सुमारास सदर लोकलच्या मोटरमनच्या दृष्टीस पडल्या. मोटरमनने प्रसंगावधान दाखवून तात्काळ लोकल थांबवली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस, तसेच रेल्वे सुरक्षा बलाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. रुळाच्या मध्यभागी लाकडी पेट्या ठेवण्यात आल्या होत्या. त्याची पाहणी केली असता त्या रिकाम्या असल्याचे आढळून आले. रेल्वे मार्गात हेतुपुरस्सर अडथळा निर्माण करण्यासाठी या पेट्या ठेवण्यात आल्या होत्या, असे वसई रेल्वे पोलिसांनी सांगितले. ही घटना गंभीर आहे. त्या लाकडी पेट्यांमध्ये जर दगड अथवा तत्सम अवजड साहित्य असते तर अपघात घडू शकला असता, असे वसई रेल्वे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) गणपत तुंबडा यांनी सांगितले. मात्र मोटरमनने सतर्कता दाखवून लोकल थांबवली आणि पुढील अनर्थ टळला असे तुंबडा यांनी सांगितले. या लाकडी पेट्या हेतुपुरस्सत तसेच खोडसाळपणे रुळांवर ठेवल्या असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याचेही त्यांनी सांगितले. याप्रकरणी मिरा रोड रेल्वे स्थानकाच्या स्टेशन मास्तर कविता भावसार यांनी तक्रार केली. त्यानुसार वसई रेल्वे पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात १२५ (अ), १२६ (२) ३२९, ३२९ (३) तसेच भारतीय रेल्वे कायद्याच्या १५२ अन्वये रेल्वे प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण करणारे कृत्य केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हशतवादी हल्ल्यानंतर रेल्वे यंत्रणा सतर्क झाली आहे. सार्वजनिक ठिकाणांवरील सुरक्षा अधिक कडक करण्यात आली आहे. सर्व विभागांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आम्ही रेल्वे स्थानकात आपली गस्त वाढविली आहे. गर्दीच्या ठिकाणी पोलीस तैनात करून बॅगांची तपासणी करण्यात येत आहे तसेच स्थानकातील हालचालीवर सीसी टीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येत आहे. प्रवासी ये-जा करण्याचे मार्ग, फलाट आदी ठिकाणी गस्त घालण्यात येत आहे, असे वसई रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भगवान डांगे यांनी सांगितले. वसई आणि विरार रेल्वे स्थानकात लांबपल्ल्याच्या गाड्या थांबतात. तेथेही तपासणी करण्यात येत आहे. रेल्वे स्थानकात खाद्यपदार्थ विक्रेते (कॅन्टीन चालक), रेल्वे सफाई कर्मचारी, बूट पॉलिश करणारे, हमाल यांच्याशी संपर्क साधून स्थानकात घडणाऱ्या बाबींची माहिती घेण्यात येत आहे. स्थानकात एखादी संशयास्पद वस्तू, व्यक्ती किंवा अन्य बाबी निदर्शनास आल्यास तातडीने कळवावे, असे आवाहन रेल्वे पोलिसांनी केले आहे.

# रेल्वे स्थानकात महिला व प्रवाशांचा सोन्याचा ऐवज लुटणाऱ्या महिलेला अटक





**डोंबिवली/प्रतिनिधी**

कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानकात घाईत असलेल्या किंवा लोकलमध्ये चढताना महिला प्रवाशांच्या गळ्यातील सोन्याचा ऐवज लुटणाऱ्या, महिलांच्या हातामधील पैशाची पर्स, मोबाईल हिसकावून पलायन करणाऱ्या एका सराईत चोरट्या महिलेला पकडण्यात डोंबिवली लोहमार्ग पोलिसांना यश आले आहे. या महिलेकडून पोलिसांनी चोरीचा सोन्याचा ऐवज, मोबाईल जप्त केला आहे. वैशाली सचदेव (२७) असे या चोरट्या महिलेचे नाव आहे. ती पोलिसांच्या अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. अनेक गुन्हे प्रकरणात पोलिसांना ती तपासासाठी हवी होती. मागील काही महिन्यांपासून कल्याण, डोंबिवली, टिटवाळा, आसनगाव, ठाणे रेल्वे स्थानकांच्या दरम्यान प्रवास करणाऱ्या महिलांच्या डब्यात चोऱ्यांचे प्रमाण वाढले होते. महिलांच्या हातामधील पैशाची पर्स, मोबाईल हिसकावून नेला असल्याच्या तक्रारी महिला प्रवाशांकडून कल्याण, डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्यात दाखल होत होत्या. अचानक महिलांच्या डब्यात चोऱ्या वाढल्याने लोहमार्ग पोलीस चक्रावून गेले होते. महिला डब्यात चोरी करण्याची महिला चोरट्याची पध्दत एकच होती. त्यामुळे ठराविक महिला चोरटीच या चोऱ्या करत असल्याचा पोलिसांना संशय होता. डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली डोंबिवली रेल्वे पोलिसांनी महिला डब्यांवर पाळत ठेऊन या डब्यात चोऱ्या करणाऱ्या महिलेच्या अटकेसाठी सापळे लावले होते. बुधवारी संध्याकाळी सीएसएमटी आसनगाव लोकल डोंबिवली स्थानकातून आसनगाव दिशेकडे निघाली होती. त्यावेळी काही महिलांना आपल्या पर्समधील पैसे, मोबाईल चोरीला गेल्याचे दिसले. काहींना आपल्या पर्स उघड्या असल्याचे दिसले. सर्व महिला प्रवाशांनी ओरडा केला. लोकल डब्यातील कोणीतरी चोरट्या महिलेनेच हे प्रकार केले असावेत असा महिलांना संशय आला. या चोरीची चर्चा सुरू असताना डब्यात एक महिला प्रवासी म्हणून संशयास्पद स्थितीत उभी होती. महिला प्रवाशांनी त्या महिलेला जाब विचारताच ती गडबडून गेली. ती डोंबिवली रेल्वे स्थानकात उतरून पळून जाण्याचा प्रयत्न करत होती. डब्यातील महिलांनी ओरडा केला आणि त्या महिलेला पकडून ठेवले. फलाटावरील रेल्वे पोलिसांनी महिलांचा ओरडा ऐकून तेथे धाव घेतली. त्या महिलेला ताब्यात घेतले.

डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्यात आणल्यावर महिला पोलिसांनी तिची झडती घेतली. तिच्याजवळ महागडा मोबाईल, चोरीचा ऐवज सापडला. ही महिला सराईत चोर असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. घाटकोपर रमाबाई आंबेडकर भागात राहणाऱ्या प्रियंका प्रकाश गांगुर्डे या रविवारी संध्याकाळी कल्याण रेल्वे स्थानकातून रेल्वे घाटकोपर रेल्वे स्थानकापर्यंत प्रवास करत असताना त्यांच्या गळ्यातील आठ तोळ्याचे चार लाख किमतीची सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरले आहे. बाजारपेठ पोलीस ठाण्यात त्यांनी तक्रार केली आहे. वैशाली सचदेव भोळाभाबडा चेहरा करून महिला डब्यात प्रवासी म्हणून चढत होती. चोरीचा कार्यभाग साधत होती.

# पाकिस्तानला समर्थन करणाऱ्या युवकाविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करीत घेतले ताब्यात!



**भिवंडी/प्रतिनिधी**

पहलगाम अतिरेकी हल्ल्याचे प्रत्युत्तर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला दिलेला असतानाच, शहरातील एका युवकाने आपल्या मोबाईलच्या ईस्टग्राम स्टोरी वर पाकिस्तानचे समर्थन केल्याबद्दल त्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे अशी माहिती भिवंडी शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कृष्णदेव खराडे यांनी दिली आहे.

अफसर अली अजगर अली शेख वय १८, रा.घुंगटनगर असे अटक आरोपीचे नाव आहे. बुधवारी भारतीय सैन्याने पाकिस्तानी अतिरेक्यांवर कारवाई केली. त्याचे संपूर्ण देशवासीयां कडून स्वागत करीत बदला घेतल्या बद्दल आनंदोत्सव साजरा केला जात असताना शहरातील रा.घुंगटनगर याने आपल्या मोबाईल वर इंस्टाग्राम स्टेटस वर चाहें जो हो जाये सपोर्ट तो बस पाकिस्तान को करेंगे असा देशविरोधी संदेश ठेवला होता.ही बाब राष्ट्रप्रेमी नागरिकांना समजताच त्यांनी शहर पोलिस ठाण्यात धाव घेत देशद्रोही व्यक्तीविरोधात कारवाई करण्याची मागणी केली.

पोलिसांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत तातडीने आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली.पोलिस कर्मचारी शैलेश भोसले यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी आरोपी युवकास रात्री उशिरा ताब्यात घेतले. त्या विरोधात भा.न्या.सं.कलम १५२ प्रमाणे देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे अशी माहिती कृष्णदेव खराडे यांनी शेवटी दिली.

# फळपिकांच्या जुन्या फळबागांचे पुनरुत्थान प्रकल्प राबविणार; शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन!

**पालघर/प्रतिनिधी**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत सन २०१५-१६ अंतर्गत फळे, फुले, मसाला लागवड, आळिंबी उत्पादन प्रकल्प जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन हा घटक राबविण्यात येत आहे. यामध्ये विदेशी फळे, फुले, मसाला लागवड व आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबू,पेरु, आवळा या फळपिकांच्या जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन करणे तसेच आळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी करणे या बाबींचा समावेश आहे. राज्यामध्ये विदेशी फळे, फुले, मसालाया पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढविणे तसेच जुन्या फळबागांची उत्पादकता वाढविणे या दृष्टीने कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या घटकांचे अनुदान पुढीलप्रमाणे आहे. १. फळे लागवड व पुनरुज्जीवन डेंझ फलोस्ट (आंबा, ऑरेंज, झेर ऑफ ग्रेप्स) रु. २ लाख ७५ हजार प्रति हेक्टर, संत्रा, मोसंबी, लिंबू रु. २ लाख ४० हजार प्रति हेक्टर, डेंझ फळे (पेरू, पपई, सफरचंद, डाळिंब इ.) रु. १ लाख ५० हजार प्रति हेक्टर या सर्व घटकांसाठी पुनरुज्जीवनासाठी ४०:६० टक्के या प्रमाणात तीन हप्त्यांत (कमाल रु. ४० हजार प्रति हेक्टर) अनुदान दिले जाणार आहे. २. मसाला पिक लागवड दीर्घकालीन व केंद्रीत मसाला पिके रु. ५० हजार प्रति हेक्टर, बहुवर्षीय मसाला पिके रु. ५० हजार प्रति हेक्टर, ३. विद्यमान फळपिके लागवड सुधारणा इंटरक्रॉप रु.६१ हजार ६०० प्रति हेक्टर, स्टुड्ब्री रु. २ लाख प्रति हेक्टर, अवसेडा रु. २ लाख ५२ हजार प्रति हेक्टर, ४. जुना फळबागांचा पुनरुज्जीवन कार्यक्रम रु.५० हजार प्रति हेक्टर, अनुदान ४० टक्के टप्प्यात जातीय-प्रमाणे रु. ८ हजार प्रति हेक्टर, ५.आंबा उत्पादन प्रकल्प आंबा उत्पादन प्रकल्प रु. ३० लाख प्रति युनिट, प्रथम वर्ष रु. १२ लाख,द्वितीय वर्ष रु. १० लाख, तृतीय वर्ष रु. ८ लाख आहे. तरी सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, विदेशी फळे, फुले, मसाला लागवड व आळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी करणे तसेच आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबू, पेरू, आवळा या फळपिकांच्या बागा असलेल्या अधिकाधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर mahadbtmahait.gov.in फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित नजिकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा, असे निलेश भागेश्वर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,पालघर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# पालघर येथे १९ मे रोजी महिला लोकशाही दिन

**पालघर/प्रतिनिधी**

समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.इंदुराणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच या महिन्याचा महिला लोकशाही दिन दि. १९ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे आयोजित करण्यात आला आहे. महिला लोकशाही दिनाचा अर्ज जिल्हाधिकारी यांना उद्देशून असावा. तसेच तालुका महिला लोकशाही दिन टोकन क्र. व तहसिलदारांच्या उत्तराची प्रत अर्जा सोबत जोडण्यात यावी. महिला लोकशाही दिनी घ्यावयाची तक्रार, अडचण सोडविण्यासाठी अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, कक्ष क्र. १०८, पहिला मजला, प्रशासकीय इमारत अ, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कोळगाव रोड, पालघर येथे करावा. संपर्कासाठी ई-मेल- dwcdopalghar@gmail.com दूरध्वनी क्र. ०२५२५-२५७६२२ यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुरव्यासह सादर करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांनी केले आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**निविदा सूचना क्रमांक ०६ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील **नोंदणीकृत कंत्राटदार** यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. १४/०५/२०२५ ते २१/०५/२०२५ सकाळी ११.०० ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

फटिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०९ (नऊ) कामे समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये लक्ष (रुपये) जी.एस.टी.वगळून | अंदाजित रक्कम रुपये लक्ष (अक्षरी) जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | वंकास गोवरशेत पाडा जोडरस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि.पालघर | रु. ७७७११७/- | अक्षरी रु. सात लक्ष सत्याहत्तर हजार एकशे सतरा मात्र | २२२५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती २२२५ ई ४०९-२७ |
| २. | वंकास आवारपाडा स्मशानभूमी जवळ रस्ता साकव बांधणे. ता.डहाणू, जि. पालघर | रु. ८१०२६०/- | अक्षरी रु. आठ लक्ष दहा हजार दोनशे साठ मात्र | २२२५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती २२२५ ई ४०९-२७ |
| ३. | वंकास जेठ्या जिवाल पानतले यांच्या घराजवळ साकव बांधणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८२१४१७/- | अक्षरी रु. आठ लक्ष एकवीस हजार चारशे सतरा मात्र | २२२५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती २२२५ ई ४०९-२७ |
| ४. | वंकास वाघईपाडा बाबू माललो तुमडा ते चैत्या काकड यांच्या घराकडे जाणारा जोडरस्ता तयार करणे. ता.डहाणू, जि.पालघर | रु. ७७९८४२/- | अक्षरी रु. सात लक्ष एकोनऐंशी हजार आठशे बेचाळीस मात्र | २२२५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती २२२५ ई ४०९-२७ |
| ५. | वंकास गावदेवा जवळ साकव बांधणे. ता.डहाणू, जि. पालघर | रु. ८२१०१४/- | अक्षरी रु. आठ लक्ष एकवीस हजार चौदा मात्र | २२२५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती २२२५ ई ४०९-२७ |
| ६. | वंकास पाटीलपाडा ते वाघईपाडा जोड रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७७७९५३/- | अक्षरी रु. सात लक्ष सत्याहत्तर हजार नवशे त्रेपन्न मात्र | २२२५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती २२२५ ई ४०९-२७ |
| ७. | वंकास पाटीलपाडा स्मशानभूमी जवळ साकव बांधणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८२००८८/- | अक्षरी रु. आठ लक्ष वीस हजार एठ्याऐंशी मात्र | २२२५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती २२२५ ई ४०९-२७ |
| ८. | वंकास पाटीलपाडा तान्हा तांडेल यांच्या घरापासून ते बाबू मेऱ्या यांच्या घरापर्यंत जोडरस्ता करणे. ता.डहाणू, जि.पालघर | रु. ७८००५३/- | अक्षरी रु. सात लक्ष ऐंशी हजार त्रेपन्न मात्र | २२२५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती २२२५ ई ४०९-२७ |
| ९. | वंकास वाघईपाडा अंजली मेऱ्या यांच्या घरापासून ते गावदेवा पर्यंत जोडरस्ता करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७७८५८५/- | अक्षरी रु. सात लक्ष अठ्ठेहत्तर हजार पाचशे पंच्याऐंशी मात्र | २२२५ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती २२२५ ई ४०९-२७ |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरिल कामाची निविदा उपलब्ध कालावधी - दि. १४/०५/२०२५ ते दि. २१/०५/२०२५ पर्यंत

निविदा उघडणे - दि. २६/०५/२०२५ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर.

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/३७६८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४.
दिनांक : ०५/०५/२०२५

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर**

**विमाका/कोवि/२०२५-२०२६/२४**

# पाकिस्तानकडून अवघ्या तीन तासात विश्वासघात!

पाकिस्तान हे कुत्र्याच्या शेपटी सारखे आहे. त्यामुळे ही शेपटी सोन्याच्या नळीत जरी घातली तरी सरळ होणार नाही. म्हणूनच पाकिस्तान वर विश्वास ठेवणे म्हणजे पायावर दगड मारून घेण्यासारखे आहे. शनिवारी १० मे रोजी याच गोष्टीचा, केवळ भारतालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला प्रत्यय आला .कारण भारताच्या युद्ध सामर्थ्यासमोर अवघ्या तीन दिवसात शरण येण्याच्या स्थितीत असलेल्या पाकिस्तानने, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पायावर लोळण घेऊन, भारताला शस्त्रसंधी करायला लावा विनंती केली होती. त्यानुसार ट्रम्प यांनी आपले वजन खर्च करून भारताला युद्ध थांबवण्याची विनंती केली . त्यानंतर पाकिस्तानने भारतासमोर गयावया करून शस्त्र संधीचा प्रस्ताव दिला .भारताने काही अटी शर्ती ठेवून तो प्रस्ताव मंजूर केला. त्यामुळे युद्ध थांबले असे वाटत होते. परंतु अवघ्या तीन तासात पाकिस्तानने शस्त्र संधी मोडली. आणि सीमेवर गोळीबार सुरू केला .तसेच भारतात पुन्हा ड्रॉ न पाठवले .त्यामुळे भारतीय लष्कर, भारतीय राज्यकर्ते, आणि भारतीय जनता संतप्त झाली असून, आता भारतात कडून पाकिस्तानला दया माया नको. सरळ आरपारची कारवाई करा अशी मागणी भारतीय जनतेने सुरू केली आहे. पंतप्रधान मोदी यांनी सुद्धा पाकिस्तानवर निर्णायक कारवाई करा असे कठोर आदेश लष्कराला दिले आहेत. त्यानंतर लष्कराने पाकिस्तानला पुन्हा आपले सामर्थ्य दाखवायला सुरुवात केली आहे. परिणामी पुढील काही तासात पाकिस्तानचा पराभव अटळ आहे. पाकिस्तान सारख्या देशात केवळ नावाला लोकशाही आहे. तिथे पंतप्रधानांना कुत्राही विचारत नाही. सर्व कारभार आयएसआय आणि लष्कराच्या बळावर चालतो. त्यामुळे पंतप्रधानांनी कुठला जरी निर्णय घेतला, तरी त्या निर्णयाला जोवर लष्कर मान्यता देत नाही, तोवर त्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. पाकिस्तानची सध्याची स्थिती भिकाऱ्यासारखी झाली आहे. जगभर कटोरा घेऊन फिरून सुद्धा कुणी छदामही पाकिस्तानच्या कटोऱ्यात टाकायला तयार नाही तशातच दहशतवाद्यांमुळे पाकिस्तानवर युद्धाची नामुष्की ओढावली. पण अवघ्या तीन दिवसाच्या युद्धकाळात पाकिस्तानची हालत खराब झाली . जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांचे पाय धरून पाकिस्तानने कसेबसे साडेआठ हजार कोटींचे कर्ज तर मिळवले. या कर्जाचा पाकिस्तानातील विकासासाठी वापर करण्याची सरकारची योजना होती. तसेच याच पैशाचा युद्धासाठी वापर केला जाणार होता. म्हणूनच पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाद शरीफ यांनी शस्त्र संधीचा निर्णय घेतला होता. त्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे पाय धरून शस्त्र संधीसाठी भारताचे मन वळवा अशी विनंती केली होती. त्यानुसार ट्रम्प यांनी प्रयत्न करून भारताला शस्त्र संधीसाठी तयार केले. त्यानंतर पाकिस्तानने रीतसर भारताला शस्त्र संधीची विनंती केली, असा प्रस्ताव पाठवला. म्हणूनच भारताने शस्त्र संधीला मान्यता दिली. परंतु अवघ्या तीन तासात पाकिस्तानने भारतावर हल्ले करून शस्त्रसंधी मोडली. शस्त्रसंधी करतानाच भारताने अट घातली होती की जर या शस्त्रसंधीनंतर पाकिस्तानने किंवा पाकिस्तानातील अतिरेक्यांनी हल्ल्याचा प्रयत्न केला, तर भारत युद्ध कायद्यानुसार कारवाई करील. ही अट पाकिस्तानने मान्य केली होती. पण पाकिस्तानचा सर्व कारभार लष्कराच्या हातात असल्यामुळे, पाकिस्तानी सरकारने घेतलेला निर्णय लष्कराला मान्य नव्हता. त्यामुळेच अवघ्या तीन तासात पाकिस्तानने शस्त्र संधी मोडली. आणि पुन्हा भारतावर हल्ले सुरू केले. परिणामी आता भारतानेही पाकिस्तानवर निर्णायक हल्ले सुरु केले आहेत. आता हे युद्ध थांबणे कठीण आहे. पाकिस्तान जोवर १९७१ चा युद्धातील परिणामा प्रमाणे शरण येत नाही, तोवर हे युद्ध आता थांबणार नाही. त्याचबरोबर या युद्धात पाकिस्तानचा विनाश अटळ आहे. पाकिस्तानकडून भलेही अणुबॉम्ब हल्ल्याची धमकी दिली जात असली, तरी प्रत्यक्षात मात्र भारतावर अणुबॉम्ब टाकण्याची पाकिस्तानची हिम्मत होणार नाही. कारण भारत सुद्धा अण्वस्त्रधारी राष्ट्र आहे. उलट भारत पाकिस्तान पेक्षा भौगोलिक दृष्ट्या कितीतरी मोठा आहे. तर पाकिस्तान भारतातील एका छोट्या राज्या इतका आहे. अशावेळी पाकिस्तान साठी अवघे दोन अणुबॉम्ब पुरेसे आहेत. या गोष्टीची पाकिस्तानला सुद्धा कल्पना आहे त्यामुळे मुठभर अतिरेक्यांसाठी २५कोटी पाकिस्तानी जनतेला मृत्यूच्या दाढेत ढकलण्याचे साहस पाकिस्तानी लष्कराला होणार नाही. पण केवळ लष्करावर नाराज असलेल्या पाकिस्तानी जनतेला खुश करण्यासाठी, लष्कराने आणि आयएसआयने भारताविरुद्ध आम्ही किती कठोर आहोत, हे दाखवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पण त्यांच्या दुर्दैवाने यावेळी पाकिस्तानला दोन आघाड्यांवर तोंड द्यावे लागत आहे. कारण एकीकडे पाकिस्तान भारतासारख्या बलाढ्य देशाविरुद्ध लढत आहे. तर दुसरीकडे त्यांच्याच बलुचिस्तान प्रांतातील बलुची बंडखोरांनी पाकिस्तान वर हल्ले करायला सुरुवात केली आहे. इतकेच नव्हे तर बलुचिस्तानने आपण स्वतंत्र झाल्याचे घोषित करून पाकिस्तानची हलत खराब केली आहे .अशा स्थितीत भारताबरोबरच्या युद्धात पाकिस्तानचा कितपत टिकाव लागेल हे मात्र सांगता येणार नाही. एकीकडे पाकिस्तानात प्रचंड अशी आर्थिक कंगाली निर्माण झाली आहे. लोकांना दोन वेळेस जेवण मिळत नाही. पाकिस्तानच्या लढाऊ विमानात इंधन भरायला पाकिस्तान कडे पैसे नव्हते. अशा स्थितीत अतिरेक्यांसाठी पाकिस्तानने भारताबरोबर युद्ध सुरू केले आहे.पाकिस्तानची ही चूक त्यांच्या बरबादीला कारणीभूत ठरणार आहे. त्याचबरोबर भारताबरोबरच्या युद्धात आपल्याला जगातील इतर राष्ट्रांचा पाठिंबा मिळेल, किंवा मुस्लिम देश म्हणून जगातील मुस्लिम राष्ट्र आपल्या पाठीशी उभी राहतील अशा भ्रमात पाकिस्तान आहे. परंतु तुर्कीये सारखा एक छोटासा देश सोडला, तर कुठलेही मुस्लिम राष्ट्र पाकिस्तान सारख्या बदनाम आणि दहशतवादी राष्ट्राच्या बरोबर उभे राहणार नाही. केवळ पाकिस्तान चीनच्या भरोशावर आहे. परंतु चीननेही पाकिस्तानला डुबलीकेट शस्त्रे पुरवून रणभूमीवर पाकिस्तानचा गळा कापला आहे. कारण गेल्या तीन दिवसांपासून चिनी शस्त्रास्त्रांवरच पाकिस्तान कडून भारतावर हल्ले सुरू होते. परंतु चिनी बनावटीची ही शस्त्रे भारताच्या एअर डिफेन्स सिस्टीम समोर टिकू शकली नाही. चीनने पुरवलेल्या शस्त्रास्त्र आणि तुर्कीयेणे पुरवलेल्या ड्रोनची अवस्था खेळण्यातल्या स्पोर्ट टॉय प्रमाणे झाली. आणि तीन दिवसातच पाकिस्तानवर भयंकर नामुष्की ओढवली. आताही चीनने किंवा तुर्कीयेणे दिलेल्या शस्त्रास्त्रांच्या जोरावर जर पाकिस्तान भारताचा पराभव करण्याची स्वप्न पाहत असेल, तर तो त्यांचा मोठा आत्मघात ठरेल. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आता तरी जगातील सर्व देशांनी पाकिस्तान किती विश्वासघातली आहे याची दखल घ्यावी आणि पाकिस्तानला कोणत्याही प्रकारची मदत करू नये. कारण पाकिस्तानला मदत म्हणजे दहशतवादाला मदत असे चित्र आहे. अशा वेळी जगातील इस्लामी दहशतवाद मोडून काढण्यासाठी कटिबद्ध असलेल्या अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली या युरोपियन राष्ट्रांसह सौदी अरेबिया इराक, इराण यासारख्या आखातातील मुस्लिम राष्ट्रांनीही पाकिस्तानला मदत करू नये. कारण अवघ्या तीन तासात शस्त्र संधीचे उल्लंघन करणारा पाकिस्तान कधी कोणाचा गळा कापील याचा नेम नाही. याचे मुख्य कारण म्हणजे पाकिस्तान मध्ये केवळ नामधारी लोकशाही सरकार आहे. परंतु तिथले प्रत्येक निर्णय लष्कर प्रमुख घेत असतात आणि पाकिस्तानी लष्कर म्हणजेच अतिरेक्यांची टोळी असल्याने त्यांच्यावर कुणीही विश्वास ठेवू नये. जगाला जर खरोखरच वाटत असेल की इस्लामी दहशतवाद कायमचा नष्ट व्हावा. तर इस्लामी दहशतवादाची फॅटरी असलेल्या पाकिस्तानला जगाच्या नकाशावरून कायमचे नष्ट करायला हवे. तरच खऱ्या अर्थाने जगातील दहशतवाद संपुष्टात येईल आणि जगातील प्रत्येक माणसाला सुखाची झोप लागेल. जगभरातील कोणत्याही राष्ट्राच्या विकास कार्यात दहशतवादाचा अडथळा येणार नाही. म्हणूनच आता पाकिस्तानचा कायमचा नायनाट करण्यासाठी जगाने भारताला मदत करायला हवी. तरच जग दहशतवादाच्या विरोधात आहे याची सर्वांना खात्री पटेल.

# शेतकऱ्यांनी आता स्वःहितासाठी, राजकीय वाटचाल शोधावी!



शेतकरी वर्ग सतत राजनीति करीत आला, परंतु तो दुसऱ्यासाठी करीत राहिला असंच म्हणावे लागेल. शेतकरी आंदोलनात सुद्धा अनेक नेते घडविले गेले, परंतु ते राजकारणात सक्रिय होऊ शकले नाही. ही सुद्धा जनतेला खंत आहे. बरेच नेते अनेक वर्षापासून सक्रिय असून, शेतकरी समस्येचे जाणकार आहेत, राजकीय व्यासपीठाचे ते हक्कदार सुद्धा आहेत. न्याय, अधिकार व हक्क मिळण्यासाठी खऱ्या अर्थाने आज शेतकरी आंदोलनातून सामाजिक, आर्थिक व राजकीय पर्याय उभा करण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण शेतकरी प्रश्न, शेतकरी कायदे, आयात-निर्यात धोरणे, केंद्रस्थानी फसलेले आहेत. त्याला उत्तम पर्याय, राजकीय ताकद प्रस्थापित केल्याशिवाय, शेतकरी आंदोलनाला यश येऊ शकत नाही.

शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी कितीही वर्षे रस्त्यावर आंदोलने केलीत, तरी शेतकरी नेते हाऊस मध्ये असल्याशिवाय ते शक्य दिसत नाही? महाराष्ट्रातील व केंद्रातील काही प्रमुख राजकीय पक्ष शेतकरी नेत्यांना विधान भवन व लोकसभा हाऊस मध्ये पोहोचू दीले जात नाही. अशा द्विधा मनस्थितीत, शेतकरी नेते व स्वतः शेतकरी सुद्धा फसलेला आहे. ऐन निवडणुकीत शेतकरी मतदान करताना जात-धर्म व नातेवाईक व आपला पक्ष पाहतो. शेतकरी म्हणून तो मतदान करत नाही, हेच त्याच दुर्भाग्य आहे? मग नेत्यांनी शेतकऱ्यांसाठी पाच वर्षे आंदोलने कां करावी? असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही, आज फक्त काँग्रेस सत्तेत असली की, बीजेपी मोर्चा काढते व बीजेपी सत्तेत असेल तर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काँग्रेस मोर्चा काढते? म्हणजे शेतकरी फक्त परातीत घोळण चालू आहे.

दोघांचाही शेतकऱ्यांच्या नावाने ओरडून घसा कोरडा झाला आहे. पण शेतकरी प्रश्न काही मिटविले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आता महाराष्ट्रातील व देशातील राजकीय अस्थिरता लक्षात घेता, राजकीय खेळी-खेळणे, तसेच सक्षम पर्याय उपलब्ध करण्याकरिता, शेतकरी आंदोलनातून हक्काचे राजकीय व्यासपीठ तयार झाले पाहिजे. नुकत्याच झालेल्या निवडणूक विधानसभा निवडणुकीत तेलंगणा, हरियाणा, पंजाब, महाराष्ट्र येथील शेतकरी चळवळी समाप्त करण्याचे कट कारस्थान भारतातील मोठ्या राष्ट्रीय राजकीय पक्षांनी केले. आता नवीन पर्याय शोधण्यासाठी मागील घडामोडीचा कोणताही उपद्रव न मांडता पुढील कार्यक्रमाची राजकीय रूपरेषा ठरविण्यासाठी तयारी करण्याचीं गरज आहे. शेतकरी आंदोलनाशी संबंधित आजी-माजी शेतकरी नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी, श्री गुरुदेव सेवकांनी व फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारवंतांनी आणि इतरही राजकीय पक्षातील विस्थापित नेत्यांनी, तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी, आवर्जून आता पुढील राजकीय पर्याय उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करावे.

**ना जात, ना पात, ना प्रांत,**
**ना पक्ष, किसान बचाव एकही लक्ष...**
**ना हिंदू खत्रे मे है, ना मुस्लिम खतरे मे है...**
**आज तो सिर्फ किसान खतरे मे है...**

राजकीय लढाई आता, शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी त्याकरिता पुढील जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिकांसाठी राजकीय पर्यायावर चर्चा व्हावी. प्रत्येक निवडणुकीत परिस्थिती सारखी नसते, आताच मागील लोकसभेच्या निवडणुकीत जी देश पातळीवर परिस्थिती होती, तीच राज्य पातळीवर विधानसभेच्या वेळेस मात्र व्यवस्था बदलली. मागच्या निवडणुकीत काय झालं ते या निवडणुकीचा आधार घेऊन पुढील व्यवस्थेची दिशा बदलल्या जाते. त्यासाठी मागील उदाहरणे काही लागू पडतील असं काही निश्चित नसते. प्रत्येक निवडणुकीत पुढील दिशा आणि नवीन व्यवस्था ठरवली जाते.

शेतकऱ्यावर झालेल्या अन्यायाची वाचा फोडण्यासाठी गेल्या पिढ्यां पिढ्या जुन्या पद्धतीने घाव घालण्याची पध्दत अजूनही चालू आहे, अन तेव्हा पासूनच शेतकऱ्यांच्या लुटीची व्यवस्था सुद्धा तशीच चालू आहे. अनेक शेतकरी नेत्यांनी परिवर्तन होण्यासाठी चालू व्यवस्थेवर घाव घातला, परंतु गावातील गटबाजी व जातीची पकड तोडणे शक्य झाले नाही. शेवटी कोणताही दगड एका घावाने फुटत नाही, तर त्यासाठी चारूबाजूंनी चौफेर आवाज उठवल्याशिवाय ही व्यवस्था साकारल्या जाणार नाही. शेतकरी धोरणाची जी कुचंबना झाली, ती सतत घाव करून शेतकरी आंदोलनाने ती कोंडी फोडली व आवाज उठविला. आज त्यामुळेच अनेक शेतकरी संघटना निर्माण झाल्यात हे सत्य नाकारता येत नाही. शेतकरी समस्या विषयी, आयात-निर्यात धोरणाविषयी जागरूकता तयार होऊन प्रत्येक सुशिक्षित बेरोजगारांना शेतकऱ्यावरील अन्याय व शेतकऱ्यांचा झालेला घात, हे समजायला आता वेळ लागत नाही.

महाराष्ट्रातच नाही, तर देशात जिथे जिथे पंतप्रधानच्या सभा होतात, तिथे तेथील स्थानिक पातळीवरील शेतकरी कार्यकर्त्यांना, स्थानबद्ध केल्या जाते, शेतकरी नेत्यांना अटक केल्या जाते. आत्ताच नागपूरला पंतप्रधान आले असता विदर्भ चळवळीतील शेतकरी नेत्त्याना स्थानबद्ध करण्यात आले होते. तसेच मागील काही महिन्यापूर्वी नाशिक व यवतमाळ येथे पंतप्रधान आले असता सुद्धा तेथील शेतकरी नेत्यांना स्थानबद्ध करण्यात आले होते. म्हणजे शेतकरी हा गुन्हेगार आहे का? शेतीमालाच्या धोरणावर सरकारने घेतलेली भूमिका ही सभेत जाताना तोंड देण्यासाठी अडचणीची वाटते काय? आपण जर भारतात कुठे फिरलो तर शेतकरी आक्रमक होतील, ही भीती त्यांना सतावत आहे. कारण आपण शेतकऱ्यांच्या हिताचं सोनं चोरले, कष्टाचं मूल्य त्यांना देण्यात येत नाही, किंवा सतत शेतकऱ्यांच्या विरोधात आपण वागत आहोत याची जाणीव अजून पंतप्रधानांना झाली असेल. शेतकऱ्यांच्या शेतीमालाचा हक्क आपण लुटतो आहे, शेतकऱ्यांना फसवतो आहे, ही बाब सत्ताधीशांच्या लक्षात तर आली असेल, शेतकरी समस्येची जाणीव सत्ताधीशांच्या जरी लक्षात आली असेल, तरी पण ते सूळबुद्धी व क्रूरबुद्धी शेतकऱ्यावर वापरल्याशिवाय राहणार नाही! हे ही सूर्यप्रकाशा इतके सत्य आहे. याला वाचा फोडण्यासाठी आता शेतकरी आंदोलनातील नेतेच तोंड देऊ शकतात याची खात्री नक्कीच सत्ताधीशाना आहे. शेतकऱ्यांना न्याय दिला नाही, शेतकऱ्यांच्या जीवनात आपण माती कालवली हे आता दिवसेंदिवस सत्य उघड होत आहे. काँग्रेस-बीजेपी या मोठ्या नेत्यांना सध्याचीच परिस्थिती मान्य आहे. म्हणूनच क्रूर बुद्धीने शेतकऱ्यावर अन्याय करून पुन्हा छातीवर बसण्यासाठी, जबरदस्तीने फिरत आहे. शेतीमालाला भाव मागणे हा गुन्हा आहे, म्हणून त्यावर गोळीबार केल्या जातो. असरूधुराच्या नळकांडा सोडल्या जातात. म्हणजे वडिलोपार्जित किंवा स्वःकष्टारजित कमावलेल्या प्रॉपर्टीवर, जर धान्य उगवत असेल, पिक काढीत असेल, तर त्याच्या मालाचा भाव मागण्याचा अधिकार शेतकऱ्याला कां ठेवला नाही. ही कृती हाणून पाडण्यासाठी आता सज्ज व्हावे लागेल. अशी चुकीचे कायदे केंद्रात जाऊन बदलावे लागतील. कारण आतापर्यंत पाठवीलेल्या सत्ताधीशांनी आमदार-खासदारांनी हे काम अजून पर्यंत केले नाही. देशात शेतकऱ्यावरच अन्याय होत गेले, कारण देशातील पैशाचा स्त्रोत हा शेतीतून तयार झाला आणि त्या पैशाची विल्हेवाट शहरीकरणासाठी वापरले गेली. राज्य व केंद्र सरकारने औद्योगिकरणाच्या नावाने भांडवलदाराला ती पुरवली आणि भांडवलदाराने भारतातला शेतकरी शेतमजुराच्या घामाचा पैसा बाहेर देशात नेऊन पळून गेले. या देशात फक्त शेतकऱ्यावर अन्याय झालेत. शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र कृषी न्यायालय सुद्धा झाले नाही, या देशात फौजदारी कोर्ट आहे, फॅमिली कोर्ट आहे, लेबर कोर्ट आहे, औद्योगिक कोर्ट आहे, मग या स्वतंत्र भारतातील शेतकऱ्यांसाठी कृषी प्रधान देशात, स्वतंत्र कृषी न्यायालय का उघडले गेले नाही. शेतकऱ्यांचे न्याय निवाडे दिवाणी न्यायालयात तुंबट ठेवून शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे परेशान केल्या जाते. देशात उत्पादन काढण्यासाठी कृषी मंत्रालय तयार केले गेले, शेतीच्या रेकॉर्डसाठी महसूल मंत्रालय केले, शेती मोजमापासाठी भूमी अभिलेख तयार केले, तर मग शेतकऱ्यांना न्याय, हक्क, अधिकार देण्यासाठी त्याच्या स्वतंत्र व्यवस्थेला जगविण्यासाठी स्वतंत्र शेतकरी मंत्रालय का वेगळे केल्या जात नाही. चारही बाजूने हा अन्याय शेतकऱ्यावर होत आहे. पुढेही कोणत्याही ठिकाणी, महाराष्ट्रातच नव्हे तर देशात सभा होतील तेव्हा शेतकरी नेत्यांनाच अटक व स्थानबद्ध केल्या जाईल, हे पण तेवढेच खरे दिसत आहे.

**– धनंजय पाटील काकडे, ज्येष्ठ साहित्यिक व सरसेनापती शेतकरी आंदोलन समिती**

# लोककल्याणकारी राजा छत्रपती शाहू महाराज!



६ मे लोककल्याणकारी राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा स्मृतिदिन ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर करवीर संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मूलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्याभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला. म्हणून ते राजर्षी बनले ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतून बाहेर काढून तत्कालीन रूढी परंपरा नाकारून त्यांनी कोल्हापूर संस्थानमध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले शिक्षणाचे महत्त्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर गरीब अस्पृश्यदलित बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तर त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित दुर्लक्षित वर्गातील मुलासाठी वसतीग्रह काढली विविध जाती धर्मातील मुलासाठी त्यांनी २२ वसतीगृहे स्थापली शेकडो मुले शिकले शिक्षण क्षेत्रात मुलीची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना चाळीस रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा १ लाख रुपये इतका होता यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्य शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केला मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून सहा जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अमलबजावणी केली शाळा, दवाखाने, पानवटे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे त्यांच्याशी कोणी भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला १९१७ सली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवदासींची घातक प्रथा बंद केले बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावुन घेण्यासाठी १९१६ सली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहस कायदेशीर मान्यता दिली इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल शाहूपुरी व्यापार पेठ शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था राधानगरी धरणाची उभारणी केली शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट ची स्थापना केली चित्रकला लोककला संगीत साहित्य नाटक कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला शाहू महाराज आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहेत बाबासाहेब मॅट्रिक मध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे आमंत्रण दिले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले हे आर्थिक अडचणीमुळे पुढे बंद करावे लागले जेव्हा हे शाहू महाराजांना समजले तेव्हा त्यांनी अडीच हजार रुपयाची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव दलित उपेक्षितांचा उद्धार शिक्षण उद्योगधंदे कला क्रीडा आरोग्य या क्षेत्रामध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणी केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यासाठी मार्गदर्शक आहे. त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एक प्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. स्मृतिदिनानिमित्त लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना 'क्राईम संध्या' परिवाराच्या वतीने विनम्र अभिवादन!

**– प्राचार्य शंकर सोनवणे**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

12 TO 18 MAY 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 5/11/2025 5:04 PM Page 1



## आपत्ती व्यवस्थापनासाठी कोंकण विभाग सज्ज

# शून्य अपघात हे आपले प्रमुख ध्येय -डॉ.विजय सुर्यवंशी

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

आपत्ती सांगून येत नाही, परंतु आपत्तीमुळे होणारे नुकसान रोखणे आपल्याच हातात आहे. Zero Casualty म्हणजेच शून्य जीवितहानी हेच आपले प्रमुख ध्येय असावे, असे स्पष्ट निर्देश कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी दिले. पावसाळा पूर्वीच्या तयारीचा आढावा घेताना दूरदृष्य प्रणालीद्वारे कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांसह विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत त्यांनी हे मत व्यक्त केले. या बैठकीस जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, नगरपालिका अधिकारी, जिल्हा परिषद अधिकारी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, कोकण रेल्वे, एसटी महामंडळ, नागरी संरक्षण, हवामान विभाग व औद्योगिक आरोग्य सुरक्षा विभागातील अधिकारी उपस्थित होते. आयुक्त डॉ. सुर्यवंशी म्हणाले की, कोकणात पावसाळ्यापूर्वी अचूक नियोजनाची आवश्यकता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यावर्षी मागील वर्षाच्या तुलनेत अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. मागील वर्षी कोकण विभागात सरासरी ३ हजार १५८.१७ मिमी पावसाची नोंद झाली होती. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वाधिक ३ हजार ९९४.४० मिमी पाऊस झाला होता. त्यामुळे संभाव्य नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाण्यासाठी संपूर्ण कोकण विभागात योग्य नियोजनाची गरज आहे. जिल्हा, तालुका व



ग्रामस्तरावर आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून संबंधित प्राधिकरणाकडून मंजूरी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोकणात सध्या २ हजार ९८९ शोध व बचाव पथके कार्यरत असून त्यात एकूण २० हजार २७८ प्रशिक्षित सदस्य आहेत. या सदस्यांनी आपदा मित्र उपक्रमाअंतर्गत तालुका व जिल्हास्तरीय प्रशिक्षण घेतले आहे. मे २०२५ अखेरपर्यंत मॉकड्रिल्स राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**धरणातील पाणी विसर्गाचे नियोजन**

कोकण विभागात ०९ मोठे, ०९ मध्यम प्रकल्प आणि १४३ लघु प्रकल्प अशी धरणे आहेत. पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टीमुळे धरणे भरल्यास, नियोजित पद्धतीने पाण्याचा विसर्ग करावा व नागरिकांना वेळीच इशारा द्यावा. यासाठी स्थानिक प्रशासनाने (उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नगरपालिका) जलद प्रतिक्रिया देण्यासाठी नियंत्रण कक्ष सुरू करावा. विसर्गाच्या आधी संबंधित यंत्रणांना सूचना देणे आवश्यक आहे, विशेषतः जेथे पाण्याचा धोका संभवतो. धबधब्यांच्या ठिकाणी जाणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजन करावे. अशा ठिकाणी जवळपासच्या रीसॉर्ट, हॉटेल मध्ये साहसी खेळांवर बंदी आणावी अशा ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे नियोजन करावे.

**अत्यावश्यक सेवा व सुविधा सज्ज ठेवाव्यात**

पावसाळ्यात पूर, दरड कोसळणे, वीज कोसळणे, चक्रीवादळ, झाडे/इमारती कोसळणे, रस्ते बंद होणे या घटना घडतात. अशावेळी गडइ, डंपर, वूड कटर, ट्रक अशी यंत्रसामग्री तत्काळ उपलब्ध ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. बाधित नागरिकांना स्थलांतर करण्यासाठी शाळा, मंदिर, हॉल इ. ठिकाणे निवासासाठी सज्ज ठेवावी व पाणी, अन्न, वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात. धरणातील पाण्याचा विसर्ग नियोजित पद्धतीने करावा व स्थानीय प्रशासनाने विसर्गापूर्वी नागरिकांना वेळीच इशारा द्यावा. एनडीआरएफ च्या तुकडयांना तैनात ठेवावे. त्यांचे संपर्क क्रमांक अद्यावत ठेवावे. रेल्वे व रस्ते वाहतुकीस अडथळा झाल्यास पर्यायी वाहतुकीसाठी महाराष्ट्र परिवहन महामंडळाशी समन्वय साधावा.

**आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर**

पावसाळ्यात साथीचे रोग वाढू शकतात. यासाठी औषधांचा साठा, पाण्याचे शुद्धीकरण, साथरोग नियंत्रण कक्ष स्थापनेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. नागरी संस्थांनी नियमितपणे पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासून नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे.

**आपत्ती नियंत्रणासाठी २४x७ नियंत्रण कक्ष**

सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, तहसील कार्यालये आणि महानगरपालिका स्तरावर २४x७ आपत्ती नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कक्षात संगणक, इंटरनेट, ई-मेल, दूरध्वनी, हॉटलाइन सेवा उपलब्ध असावी. आपत्तीशी संबंधित कोणतीही माहिती तत्काळ शासनाला कळवावी. नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणींना तत्काळ प्रतिसाद द्यावा. अशा सूचना आयुक्त डॉ. सुर्यवंशी यांनी यावेळी दिल्या. तसेच Zero Casualty हे फक्त घोषवाक्य नाही, तर प्रत्येक घटकाने अंगीकारायचे ध्येय आहे, असे सांगत आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी प्रत्येक यंत्रणेला सज्जतेचे आणि समन्वयाचे आवाहन केले.

## भाईंदरमध्ये १७ कोटी ७४ लाखांचे कोकेन जप्त

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

भाईंदर पूर्वेला नवघर पोलीस ठाणे हद्दीत मोतीलाल नगरमध्ये एका महिलेच्या घरातून ११ किलो ८३० ग्राम वजनाचे कोकेन सापडले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात १७ कोटी ७४ लाख ५० हजार रुपयांचे हे अंमली पदार्थ जप्त करत एका महिलेला अटक करण्यात आली आहे. काशीमिरा गुन्हे शाखा युनिट-१ यांना गुप्त माहिती मिळाली. त्यावरून त्यांनी सापळा रचून भाईंदर पूर्वेला सबिना नजीर शेख (४२) मोतीलाल नगर येथे छापा मारला असता महिला आरोपी सबिना शेख ही आपले राहत्या घरात एकूण १७ कोटी ७४ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ११ किलो ८३० ग्रॅम वजनाचा कोकेन हा अंमली पदार्थ आपल्या ताब्यात बाळगला असताना मिळून आली. तिने सदरचा अंमली पदार्थ (ड्रग्स) हा इसम ऍन्डी नावाचा अफ्रिकन नागरिक याच्याकडून आणला असल्याचे सांगितले. यावरून याप्रकरणी गुन्हे शाखेचे सहाय्यक फौजदार संजय शिंदे यांच्या तक्रारीवरून नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर सदरची कारवाई ही गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट -१ चे पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने केली आहे. तर सदरील गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत हे करत आहेत. आता काही दिवसांपूर्वीच मिरा- भाईंदरमधील एका पोलीस कर्मचार्यांच्या शेतात लातूर जिल्ह्यात ड्रग्स फॅक्टरी सापडली होती. त्यावेळी महसूल गुप्तचर यंत्रणेने १७ कोटींचा मुद्देमाल जप्त केला होता.

## गावठी दारू अड्ड्यावर पोलिसांची धाड; ७४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**रेणापूर/प्रतिनिधी**

रेणापूर पोलीस ठाणे हद्दीतील महापूर शिवारात हातभट्टी दारू तयार करण्यासाठी साठवून ठेवलेल्या कच्च्या मालाच्या अड्ड्यावर, स्थानिक गुन्हे शाखेची छापेमारी करून ८० बॅग निष्कृष्ट गूळ व ७ किलो नवसागरच्या गोळ्या असा एकूण ७४, हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



या बाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यावर प्रभावी कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबवून अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिले आहेत. लातूर पोलीस कडून मोठ्या प्रमाणात मासरेड चे आयोजन करून जिल्ह्यातील लपून-छपून हातभट्टी दारू तयार करणाऱ्या ठिकाणावर जोरदार कारवाई करत हातभट्टी दारू तयार करणारे, देशी-विदेशी दारूची अवैध विक्री व्यवसाय करणाऱ्या लोकांवर गुन्हे दाखल करून लाखो रुपयाचा मुद्देमाल जप्त व हातभट्टीच्या मुद्देमाल नष्ट करण्यात येत आहे. ६ मे २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे लातूर ते रेणापूर जाणाऱ्या रोडवरील महापूर गावाच्या शिवारामध्ये एक व्यक्ती त्याच्या शेतातील पत्राच्या शेडमध्ये हातभट्टी दारू तयार करण्यासाठी लागणारा कच्चामाल नवसागर (mmonium Choroid)च्या गोळ्या, निकृष्ट दर्जाचे गुळाची साठवणूक केली आहे अशी माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने महापूर गावाच्या शिवारातील पत्राच्या शेडवर छापा मारला. तेथे ७ किलो नवसागर (mmonium Choroid) च्या गोळ्या व ८० बॅग निकृष्ट दर्जाचे गुळ असा एकूण ७४ हजार ३४० रुपयाचा मुद्देमाल मिळून आला. त्यावरून इसम नामे बाबुराव ज्ञानोबा ढमाले, राहणार महापूर जिल्हा लातूर (फरार) याचे विरुद्ध पोलीस ठाणे रेणापूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे सूचना व मार्गदर्शनात लातूर पोलिसा कडून अवैध धंद्याविरुद्ध जोरदार कारवाई करण्यात येत असून सदरची कारवाई यापुढेही सुरूच राहणार आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अंमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, संजय कांबळे, राहुल कांबळे यांनी केली आहे.

## आश्रमशाळांच्या समस्या प्राधान्याने सोडविणार -अतुल सावे



**मुंबई/प्रतिनिधी**

आश्रमशाळांच्या माध्यमातून चांगले विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्न होत असतात. त्यामुळे इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या विमुक्त जाती आणि भटक्या जमाती (विजाभज) प्रवर्गाच्या निवासी आश्रमशाळांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यात येणार असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले. मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खासगी अनुदानित निवासी आश्रम शाळांतील अडचणींबाबत मंत्रालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच निवासी आश्रमशाळाचे संस्थाचालक उपस्थित होते. मंत्री श्री. सावे म्हणाले, आश्रम शाळांच्या प्रलंबित अनुदानाचे वितरण टप्प्याटप्प्याने लवकरच करण्यात येईल. संचमान्यताबाबत शिक्षण विभागासोबत बैठक घेण्यात येईल. संचमान्यता व वेतन अनुदानासाठी प्रस्ताव तयार करावेत संचमान्यता प्रक्रियेनंतरच रिक्त पदांची यादी तयार करावी. आश्रम शाळांच्या संस्थाचालकांनी मांडलेल्या समस्या सोडविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. शासनाच्या सीएमश्री योजनेत आश्रमशाळांचा समावेश करण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या तसेच आश्रम शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांचे आयुष्यमान भारत कार्ड काढून घ्यावे. तसेच विद्यार्थ्यांसाठी राज्य, विभाग आणि जिल्हास्तरावर क्रीडा स्पर्धाचे आयोजन करावे,असेही त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत आश्रमशाळेत महिला अधीक्षकांची नियुक्ती, रिक्त पदांची भरती, आश्रम शाळांमध्ये सौरऊर्जेचा वापर, सीएमश्री योजनेत समावेश, क्रीडा स्पर्धाचे आयोजन, आश्रमशाळा संहिता याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

### शिकण्याच्या इच्छा शक्ती पुढे वयाचे बंधन थिटे

## जिद्द असेल तर तुम्ही यश नक्कीच मिळवू शकता हे गोरखनाथ मोरे यांनी सिद्ध करून दाखवलं!

**वाडा/प्रतिनिधी**

शिकण्यासाठी वयाचे बंधन नसते. केवळ इच्छाशक्ती आणि कष्ट करण्याची जिद्द असेल तर तुम्ही यश नक्कीच मिळवू शकता हे सिद्ध करून दाखवलं आहे गोरखनाथ मोरे या ७६ वर्षीय आजोबांनी व भालचंद्र निपुर्ते या ४५ वर्षीय इसमान. तरुणपणी नेव्हीमधे नोकरी लागलेल्या मोरे यांचे शिक्षण ११वीपर्यंतच झाले होते. तब्बल ३२ वर्षे नेव्हीतील नोकरी आणि संसाराचा गाडा यामुळे इच्छा असूनही मोरे यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. मात्र आपलं अर्धवट राहिलेलं शिक्षण पूर्ण करायचं आणि वकील बनायचं हे गोरखनाथ मोरे यांचं स्वप्न आहे. मोरे यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेली बारावीची परीक्षा दिली आणि ४५ टक्के गुण मिळवून पासही झाले. वकील होण्याची इच्छा असल्याचे त्यांनी सांगुन त्यासाठी वकिलीच्या शिक्षणासाठी CET परीक्षा देखील दिली आहे. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी वसईच्या न्यू इंग्लिश स्कूल जूनियर कॉलेजमध्ये बारावी कला शाखेत प्रवेश



घेतला होता. बारावीचा निकाल समजला आणि मोरे यांच्यासह त्यांच्या कुटुंबाचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. असाच प्रयत्न शहापूर तालुक्यातील टहारपूर येथील भालचंद्र निपूर्ते या रेल्वे खात्यात काम करणाऱ्या ४५ वर्षीय इसमाने केला व याच वर्षी (फेब्रुवारी २०२५) झालेल्या बारावीच्या परीक्षेत विज्ञान शाखेतून ४७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होण्याचा सन्मान मिळविला आहे. भालचंद्र निपूर्ते हे दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर परिस्थितीमुळे पुढील शिक्षण घेऊ शकले नव्हते. अत्यंत हुशार असलेल्या भालचंद्र यांना रेल्वेत नोकरी मिळाली. मात्र उच्च शिक्षणा अभावी त्यांना नोकरीत पदोन्नती मिळत नव्हती. त्यांनी पदोन्नती मिळण्याची जिद्द बाळगून फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेली विज्ञान शाखेतून बारावीची परीक्षा दिली. आणि या परीक्षेत ते ४७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. जिद्द बाळगली तर माणूस यश प्राप्त करु शकतो हे या दोन इसमांनी बारावीच्या परीक्षेत यश संपादन करुन समाजाला दाखवून दिले आहे.

## अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी केली पाहणी

**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात अवकाळी वादळी पावसामुळे किनारपट्टी भागातील मच्छीमार बांधवांवर मोठे संकट ओढावले आहे. बोटी, जाळी, मासेमारीसाठीची यंत्रसामग्री यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अनेक कुटुंबांच्या घरांची छत उडून गेली आहेत.

या पार्श्वभूमीवर पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. खासदारांनी मच्छीमार बांधवांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या आणि नुकसानग्रस्त बोटी तसेच साधनसामग्रीची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाईची प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी खासदार डॉ. सवरा म्हणाले, मच्छीमार समाज हा आर्थिकदृष्ट्या अत्यंत कष्टकरी आहे. अशा आपत्तीच्या वेळी शासनाने त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे अत्यावश्यक आहे. सध्याच्या शासकीय नियमानुसार नादुरुस्त बोटींना आणि अन्य नुकसानग्रस्तांना दिली जाणारी मदत अत्यंत अपुरी आहे. त्यामुळे या नुकसानग्रस्तांना योग्य तो मोबदला मिळावा, यासाठी मी स्वतः मुख्यमंत्री आणि मत्स्य व्यवसाय मंत्री यांच्याकडे चक्रीवादळाच्या वेळी ज्या पद्धतीने विशेष आर्थिक मदत जाहीर करण्यात आले होते, त्याच धर्तीवर याही वेळी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची मागणी केली आहे. मदतीचा मार्ग जलदगतीने खुला व्हावा यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे. तसेच, जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये घरांचे व शेतीचे झालेले नुकसानही गंभीर आहे. या ठिकाणीही तातडीने पंचनामे करून शासकीय आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. या दौऱ्यात मच्छीमार संघटनांचे पदाधिकारी, स्थानिक ग्रामस्थ तसेच प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत

### श्री जय मल्हार खंडोबा देवस्थान मंदीराचे जीर्णोद्धार कार्यक्रम संपन्न

लातूर : श्री जय मल्हार खंडोबा देवस्थान मोती नगर मंदीराचे जीर्णोद्धार कार्यक्रम सामाजिक कार्यकर्ता निलेश भैय्या ठक्कर यांच्या शुभहस्ते अभिषेक व पुजा आरती करण्यात आला. भाविक भक्तांनी आरतीचा व प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी खंडोबाचे वारू मंडळाचे जयराम सुर्यवंशी, अनिल धुमाळ, खंडू कुंजीर, अशोक काळे, गणेश हाके, युवराज चव्हाण, निलेश लोखंडे,गजू मोरतोळे पांडूरंग भिसे, गोविंदा धुमाळ, किशोर काळे, कृष्णा शिंदे, रवि काटकर, दादा एकाले विलास कांबळे आदी उपस्थित होते.

### १७० ग्रीन बेल्ट्चे सर्वेक्षण पूर्ण

लातूर : लातूर शहरातील विविध भागातील ले-आऊटमध्ये नागरीकांच्या सार्वजनिक वापरासाठी ग्रीन बेल्टन, ओपन स्पेस उपलब्ध आहेत, ले-आउटचे निर्माण करताना मूळ विकासकाने एकूण जमिनीच्या १० टक्के जागा स्थानिक ले-आउटधारक रहिवाशांच्या सार्वजनिक वापरासाठी खुली (ओपन स्पेस) सोडणे क्रमप्राप्त आहे, त्या दृष्टीने ओपन स्पेसचे रेकॉर्ड तयार करण्याची संकल्पना उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी मांडली होती. त्याअनुषंगाने दिनांक ०५ मे २०२५ रोजी उपायुक्तांनी मागील दोन दिवसापासून सुरू असलेल्या ग्रीन बेल्ट विशेष सर्वेक्षण मोहिमेची सविस्तर आढावा बैठक घेतली व पुढील टप्प्यातील सर्वेक्षणाच्या संबंधी मार्गदर्शक सूचना केल्या. सदर विशेष मोहिमेसाठी ९ पथकांची स्थापना करण्यात आलेली होती. मालमत्ता विभागांतर्गत केल्या जाणाऱ्या या सर्वेक्षणात जवळपास १७० ग्रीन बेल्ट, ओपन स्पेस चे सर्वेक्षण झालेले असून, सर्व ग्रीन बेल्ट, ओपन स्पेसचे डिजिटल मॅपिंग होणार आहे. अद्याप न सापडलेल्या ग्रीनबेल्ट, ओपन स्पेस जागांचा शोध घेणे, अतिक्रमण असलेल्या जागांवर यथायोग्य कारवाई करून सुरक्षित करणे व त्या जागांना पुढे नागरिकांच्या सोयीसाठी उपलब्ध करून देऊन शहराच्या विकासास चालना देण्याचा मानस मनपाचा असल्याचे उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी स्पष्ट केले. सोबतच नागरिकांनी पुढाकार घेऊन ग्रीनबेल्ट, ओपन स्पेस बद्दल ची माहिती त्यांच्याकडे असल्यास मालमत्ता विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन सुद्धा केले.

### जिल्ह्यातील सगर गवंडी समूहाची क्षेत्रपाहणी

लातूर : महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य डॉ. गोविंद हरिबा काळे, प्रा. मच्छिंद्रनाथ तांबे व डॉ. मारुती शिकारे हे आज लातूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांनी लातूर जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जावून सगर गवंडी समूहाची क्षेत्रपाहणी केली. तसेच त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. आयोगाच्या सदस्यांनी सर्वप्रथम लातूर तालुक्यातील वासनगाव येथील सगर गवंडी समूहाच्या कुटुंबांना भेटी देवून त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी तुकाराम भालके यांच्यासह तलाठी, ग्रामसेवक उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी निलंगा तालुक्यातील अंबुलगा व हनुमंतवाडी येथे भेट दिली. यावेळी तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्यासह गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. औसा तालुक्यातील तुंगी येथील सगर गवंडी समाजातील नागरिकांशी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांनी संवाद साधला. यावेळी तहसीलदार घनश्याम अडसूळ, गट विकास अधिकारी युवराज म्हेत्रे यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य डॉ. काळे, प्रा. तांबे व डॉ. शिकारे यांनी सागर गवंडी समाज समूहाची क्षेत्रपाहणी केली, तसेच घरांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी या समाजातील नागरिकांशी संवाद साधून त्यांची समाजिक, आर्थिक परिस्थिती जाणून घेतली.

### १३८ महिलांना शिलाई प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र प्रदान

लातूर : विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने लातूर तालुक्यातील बाभळगाव येथे चालवलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप नुकताच झाला. या कार्यक्रमात तब्बल १३८ महिलांनी आपले ३ महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले, ज्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. ट्वेंटीवन ग्री लीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विलासराव देशमुख फाउंडेशनने हे प्रशिक्षण केंद्र चालवले. या केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाईचे प्रशिक्षण देण्यात आले. शिलाईच्या विविध पद्धती, डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या कौशल्यांचे सखोल ज्ञान महिलांना या प्रशिक्षणातून प्राप्त झाले. बाभळगावमधील महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी फाउंडेशनने हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला. या मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्रामध्ये बाभळगावातील १३८ महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. या महिलांना सेजल सूर्यवंशी आणि क्रांती उफाडे या कुशल प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले. ३ महिन्यांच्या कालावधीत या महिलांना शिलाई कामातील सर्व कला आणि विविध प्रकारच्या शिलाईचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक संगीता मोळवणे, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, अविनाश देशमुख, सदस्य गोपाळ थडकर, प्रशिक्षक सेजल सूर्यवंशी व क्रांती उफाडे, गजानन बोयणे आणि सर्व प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या.

### कृषि दर्जामुळे मत्स्य व्यावसायिकांना न्याय!

पालघर : कृषि दर्जा देऊन महाराष्ट्र सरकारने मत्स्य व्यावसायिकांना न्याय दिला आहे, अशा शब्दात उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल व राज्याच्या मत्स्य धोरण विषयक समितीचे अध्यक्ष राम नाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांचे या निर्णयासाठी अभिनंदन केले आहे. मासेमारी ही सागरी शेती मानली जात असली, निसर्गावरच अधिकतर अवलंबून असली तरीही मत्स्य व्यावसायिकांना शेतकऱ्यांप्रमाणे अद्यापपर्यंत कोणत्याही सोयीसुविधा नव्हत्या. मत्स्य व्यवसायालाही कृषि दर्जा दिला पाहिजे, त्यासाठी स्वतंत्र मंत्रालय असावे या मागण्या खासदार असल्यापासून म्हणजे गेली तीस वर्षे श्री राम नाईक करत होते. त्यापैकी पंतप्रधान मोदी यांच्या सरकारने स्वतंत्र मंत्रालय काही वर्षांपूर्वी निर्माण केले. आणि आता मत्स्य व्यवसायाला महाराष्ट्र सरकारने मासेमारीला कृषि दर्जा दिल्याने मत्स्य व्यावसायिकांना मोठाच दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयाने लाभान्वित मच्छिमार समाजाचे राम नाईक यांनी अभिनंदन केले आहे.

12 TO 18 MAY 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 5/11/2025 5:04 PM Page 1



# वसई-विरारमधील पाणी कर थकबाकीदारांच्या ४७१ नळजोडण्या खंडित!

**विरार/प्रतिनिधी**

पाणी पट्टी कर न भरल्याने कराची रक्कम थकीत राहू लागली आहे.पाणी पट्टी कराची रक्कम थकीत ठेवणाऱ्या नळजोडणी धारकांच्या नळजोडण्या खंडित करण्यावर पालिकेने भर दिला आहे. आता पर्यंत ४७१ नळजोडण्या खंडित केल्या आहेत. वसई विरारमध्ये पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून शहरातील नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत पालिकेला पेल्हार २० दशलक्ष लीटर, उसगाव १०, दशलक्ष लीटर, सुर्या टप्पा-१ व टप्पा-३ योजना २०० दशलक्ष लीटर, एमएमआरडीएची सुर्या योजनेतून १८५ पैकी १७० दशलक्ष लीटर असा एकूण ४०० दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा प्रतिदिन केला जातो. शहरात पालिकेकडून ६७ हजार ९५६ इतक्या घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक अशा नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. यांच्या मार्फत पालिकेला पाणी पट्टी कर मिळतो. मात्र काही नळजोडणी धारक कर भरणा करीत नसल्याने पाणी पट्टी कर हा थकीत राहू लागला आहे. पालिकेचे २०२४-२५ मध्ये ८८ कोटींचे पाणी पट्टी कराचे उद्दिष्ट होते. मात्र मार्च अखेर पर्यंत केवळ ७५ टक्के इतकीच कर वसुली शकली असून मोठ्या प्रमाणत कराची रक्कम थकीत राहत आहे.

त्यासाठी आता पालिकेने या थकबाकीदारांना लक्ष्य केले असून नळजोडण्या खंडित करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत शहरातील नऊ प्रभागात मिळून ४७१ नळजोडणी धारकांच्या जोडण्या खंडित केल्या असल्याची माहिती पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने दिली आहे. थकबाकी दारांची थकीत पाणीपट्टी वसूल झाल्यानंतर फेर नळ जोडणी शुल्क भरून नंतर त्यांच्या जोडण्या पुन्हा कार्यान्वित केल्या जातील. २०२४-२५ वर्षी पालिकेने पाणी पट्टी कराचे ८८ कोटींचे इतके उद्दिष्ट होते. त्यानुसार पाणी पट्टी कर वसूल करण्याचे काम सुरू केले होते. त्यापैकी केवळ ६५.९३ कोटी इतका कर म्हणजेच ७५.४७ टक्के कर वसूल झाला आहे. उर्वरित २४ टक्के कराची रक्कम थकीत राहिली आहे.कराची रक्कम थकीत राहत असल्याने सेवा देण्यात ही पालिकेला अडचणी येत असतात.

अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यानंतर पालिकेने विविध ठिकाणी जलवाहिन्या विस्तार, जलकुंभ, नवीन नळजोडण्या देण्यास सुरुवात केली आहे.पाणी वितरण व्यवस्था करण्यासाठी वर्षाला साधारणपणे १९० कोटी रुपये इतका निधी खर्च करावा लागतो. या खर्च भरुन निघावा यासाठी पालिकेने यंदाच्या अर्थसंकल्पात पाणी पट्टी करात २५ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र या कर वाढीला सर्व स्तरातून विरोध झाल्यानंतर हा निर्णय स्थगित ठेवण्यात आला आहे.

## महाराष्ट्र वर्धापन दिनानिमित्ताने राष्ट्रध्वजा रोहण

# जवाहरलाल नेहरु प्राथमिक शाळेला मेटालाईट फोकस भेट

**लातूर/प्रतिनिधी**

लातूरच्या गांधी नगरातील जवाहरलाल नेहरु प्राथमिक विद्यालयात समाज सेवक काशिनाथ जोंधळे आणि मारुती कांबळे यांनी दोन लाईट फोकस बसवून दिल्याबद्दल त्यांचा पंडीत जवाहलाल शिक्षण संस्थेच्या वतीने कोषाध्यक्ष हरिभाऊ कोनाळीकर यांच्या हस्ते शाल, पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला. प्रारंभी पंडीत जवाहलाल शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा लक्ष्मीबाई बटनपूरकर यांच्या हस्ते पं.जवाहरलाल नेहरु, डॉ.बाबाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमांचे पूजन करुन १ मे महाराष्ट्र वर्धापन दिनानिमित्ताने राष्ट्रध्वजाचे रोहण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र वर्धापन दिनाचे महत्व विषद करुन शुभेच्छा दिल्या. या वेळी सत्काराला उत्तर देताना समाजसेवक काशिनाथ जोंधळे व मारुती कांबळे या पाहुण्यांनी या शाळेमध्ये सीसीटीव्ही संच बसवून देणार असल्याचे जाहीर केले. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक राजाराम बटनपूरकर, मुख्याध्यापिका सुनिता नेत्रगावकर, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका प्रतिभा बटनपूरकर, शिक्षक शिवाजी सगर, अनिल तलवार, अर्जून सोनाळे, विजयकुमार जाधव, हरिभाऊ पेठे, विलास मानाजी, विजया कुकाले, नारायण बोयणे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक माध्यमिकच्या मुख्याध्यापिका प्रतिभा बटनपूरकर यांनी केले. आभार प्रदर्शन शिक्षिका जयश्री बोंद्रे यांनी केले.

पान १ वरून....

## चोरीच्या संशयावरून अपहरण...

आरोपी अब्दुलबारी अब्दुलरजाक मुल्ला (वय ३६), जुबेरअहमद महंमदअक्रम मौलवी (वय ३४), बिलालअहमद मुक्तारअहमद मौलवी (२५), हजरतबिलाली अहमदइसली नालबंद (२४), फय्युम मुसा नालबंद (२७), महेश संजय काळे (३६, सर्व रा. अथणी) यांना अटक केली आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. हा खून कशासाठी केला, यामागचा हेतू काय, याबाबत पोलिस कसून चौकशी करत आहे. सर्व संशयित आरोपींना गुरुवारी न्यायालयात हजर केले असता त्यांना कोठडी देण्यात आली आहे. या खुनामागील सूत्रधार कोण आहे, याचा तपास पोलिस यंत्रणा करत आहे. जिल्हा पोलिस वरिष्ठ अधिकारी भीमाशंकर गोळे, अतिरिक्त पोलिसप्रमुख आर.बी.बसरगी, उपअधीक्षक प्रशांत मुन्नोळी, सीपीआय संतोष हळुर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक जी.एस. उपाय, कुमार हडकर, मल्लिकार्जुन तळवार यांच्या पथकाने संशयितांना गजाआड केले आहे. सहायक फौजदार वाय.वाय. रामोजी, एम.बी. दोडमणी, एम.ए. पाटील, ए.ए. येरकर, एम.डी. हिरेमठ, सी. व्ही. गायकवाड, डी. वाय. मन्नापूर, जी.एस.डांगे आदींचा तपासात सहभाग होता. चौकशीत खुनाचा झाला उलगडाचोरीच्या संशयाने विकास याला तीन दिवस डांबून मारहाण करीत असताना अज्ञात व्यक्तीने याची माहिती दिली. त्यानंतर नातेवाइकांनी पोलिसांशी संपर्क साधून तो नंबर पोलिसांना दिला. पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर खुनाचा उलगडा झाला. सहा संशयित आरोपी सापडले असून, त्यांना अटक केली आहे. आणखीन सहा संशयित आरोपी फरारी असल्याची चर्चा आहे. यामध्ये परिसरातील बड्या नेत्यांचा हात असल्याची चर्चा आहे.

## चारित्र्याच्या संशयाने वेडापिसा ...

वागणं-बोलणंलाघवी होतं, त्यामुळे सोनीसुद्धा आपल्या संपर्कात आलेल्या माणसांना आपलंसं करून घ्यायची. संसाराचा आर्थिक गाडा सुरळीत चालत रहावा म्हणूनमोहन आणि सोनी दोघेही मोलमजुरी करून अर्थार्जन करत असत. दोघांचं एकमेकांवर प्रेम होतं. एकमेकांबद्दल आत्मियता असल्यामुळे दोघांचा संसार सुखाचा होता. सुखात चाललेल्या मोहन आणि सोनी यांच्या संसारात संशयाचा खडा पडला आणि संसाराला तडा गेला. सोनीच्या लाघवी स्वभावामुळे तिचे अनेक चाहते झाले होते. मोहनसमोर आणि मोहनच्या पश्चात सोनी आपल्या चाहत्यांशी अघळ पघळ बोलत असायची. हे बोलणेच मोहनला खटकू लागले होते. तो आता सोनीबरोबर गप्पा मारणाऱ्या प्रत्येकाकडे संशयाने पाहू लागला. सोनीला तो इतरांशी बोलण्यास मज्जाव करू लागला. आपल्या नवऱ्याला आपण इतरांशी बोललेलं आवडत नाही म्हणताच सोनीनेही आपल्या बोलण्यावर मर्यादा घालून घेतली. सोनी स्वतःहून इतरांशी बोलत नव्हती, पण इतरजण कारणपरत्वे सोनीशी बोलत असत. अशावेळी सोनीला त्यांच्याशी बोलणं भाग असायचं. परिणामी मोहन मनोमनी दुखावला जायचा. त्यात त्याच्या अंतर्गत हितशत्रूने त्याच्या मनात सोनीबद्दल संशय पेरला. कालांतराने तो विकसित झाला. त्याचा परिणाम म्हणजे मोहन मद्याच्या आहारी गेला. आदिवासी समाजात मद्यप्राशन हा प्रघात आहे. प्रसंगी आदिवासी समाजातील महिलासुद्धा सणासुदीला मद्यपान करत असत.

सुदैवाने मोहन मद्यापासून लांब होता, पण सोनीबद्दल संशय त्याच्या मनात घर करून बसल्याने तो मदिरेच्या आहारी गेला. मद्यप्राशन केल्यानंतर तो आता सोनीला शिवीगाळ करू लागला, त्यामुळे सोनी आणि त्याच्यामध्ये वाद होवू लागले. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले होते, त्यामुळे सोनी अस्वस्थ होती. मोहनचं वागणं-बोलणं सर्वच बदललं होतं, तरी सोनी मुकाट्याने सहन करत होती, पण एके दिवशी मद्यप्राशन करून मोहनने दारूच्या धुंदीत सोनीच्या आई-वडीलांचा उद्धार केला. ती बाब सोनीला सहन झाली नाही. त्यादिवशी पुन्हा तेच झाले. सायंकाळी मोहन ढोसलून आला होता. आल्या-आल्या त्याने जेवायला मागितले. सोनीने जेवण वाढून दिले, पण ते जेवण त्याला आवडले नाही. त्याने ताट भिरकावले. इथंपर्यंत ठीक होते, पण त्यानंतर मोहन याने सोनीच्या आई-वडीलांचा उद्धार करायला सुरूवात केली. आपल्या आई-वडीलांबाबतीत मोहनच्या तोंडून शिव्या ऐकताच तिच्या संयमाचा बांध फुटला. तिने मोहनला त्याच भाषेत प्रत्युत्तर दिले. त्याचा मोहनला राग आला. त्याने सोनीवर हात उगारला. सोनीने प्रतिकार केला. त्यांचं हे भांडण शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या मध्यस्थीमुळे शांत झाले. या दुर्दैवी प्रकाराने सोनी व्यथित झाली होती. रात्री जेवण न करता ती आपल्या घरासमोर खाट टाकून उपाशीपोटीच झोपली. आपल्या बायकोने आपल्या अंगावर हात टाकल्याचा संताप मोहनच्या मनात उसळी घेत होता. झोपावं म्हटलं तरी झोप लागत नव्हती. या कुशीवरून त्या कुशीवर तो अंथरूणात लोळत पडला होता. झोप लागत नसल्याने मोहन वैतागला होता. पहाटेचे तीन वाजले होते. झोप लागत नाही म्हणून मोहन अंथरूणावरच उठून बसला. निष्पाप सोनी खाटेवर गाढ झोपली होती. आत्तापर्य शांत असलेला मोहन अंथरूणातून उठला. आपल्या झोपडीवजा घराच्या आढ्याला लटकवलेली कुदळ त्याने हातात घेतली आणि मागचा-पुढचा विचार न करता त्या कुदळीने मोहनने गाढ खाटेवर एका कुशीवर झोपलेल्या सोनीच्या कानामागे प्राणघातक प्रहार केला. गाढ झोपलेल्या सोनीच्या डोक्यात कुदळीचा प्राणघातक घाव बसताच सोनी जनावरासारखं ओरडली. तिच्या डोक्याला कानामागे भली मोठी जखम झाली. त्यातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. त्यातच ती कायमची शांत झाली. आपल्या हातून आपल्या बायकोचा खून झाल्याचे लक्षात येताच मोहनने कुदळ जागेवरच फेकून तेथून पलायन केले. सकाळ झाली. गावातील शेतकरी-शेतमजूर बाहेर पडू लागले, तेंव्हा त्यांना सोनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसून आली. त्यांनी तात्काळ ही माहिती दभाषी गावाचे पोलीस पाटील सागर पाटील यांना दिली. माहिती मिळताच ते तात्काळ घटनास्थळी आले. वस्तुस्थितीची खात्री होताच त्यांनी याची माहिती मोबाईलवरून नरडाणा पोलीस ठाण्यात दिली. माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन बेंद्रे, उपनिरीक्षक मनोज कुअर, हेडकॉन्स्टेबल हेमंत पाटील, नारायण गवळी हे आपल्या इतर सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. मृतदेहाचा व घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आला. त्यानंतर या घटनेची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक रामा पवार यांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावर जमलेल्या लोकांकडून माहिती घेतली होती. मयत महिलेचे नाव सोनी भिल असून आदल्या दिवशीच तिचे आणि तिच्या नवऱ्याचे भांडण झाल्याचे पोलिसांना समजले. एकूणच सोनी भिलचा खून करण्यामागे तिचा नवऱ्याचाच हात असावा याचा अंदाज पोलिसांना आला होता आणि तो घटनास्थळी हजर नसल्याचेही पोलिसांच्या लक्षात आले, तरीही सबळ पुरावे गोळा करण्यासाठी श्वानपथक आणि ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. प्राणघातक वस्तूने डोक्यावर प्रहार करण्यात आल्याचा निष्कर्ष पोस्टमार्टम रिपोर्टद्वारे आल्यानंतर नरडाणा पोलिसांनी सोनी भिल हिचा मृतदेह तिच्या नातेवाईकांच्या हवाली केला. शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणाची फिर्याद दभाषी गावचे पोलीस पाटील सागर पाटील यांनी नरडाणा पोलीस स्टेशनला नोंदवल्यानंतर विभागीय पोलीस अधिकारी संजय बांवळे यांच्या मार्गदर्शनाखाली शोध पथक गठीत करण्यात आले. शोध पथकाने प्राथमिक स्वरूपात सोनी आणि मोहन यांच्या नातेवाईकांचे, शेजाऱ्या-पाजाऱ्यांचे जबाब नोंदवून घेतले. त्या जबाबाची पडताळणी करत सोनीच्या नवऱ्याने म्हणजे मोहन भिल यानेच हा निघृण खून केला असावा. असा निष्कर्ष करण्यात आला. नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील मंदाणे गावात मोहन भिल गेल्याची माहिती मिळाल्याने तपास पथकाने मंदाणे गावात जाण्याचे ठरवले. न मोहन ज्या घरात दडून बसला होता, त्या घराला घेराव घालून तपास पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याला नरडाणा पोलीस स्टेशनला आणले. पुढील कारवाईच्या दृष्टीने के तपास पथकाने मोहन भिल याला न बोलते केले असता प्रथम त्याने आपण त्या गावचे नाहीच असा पवित्रा घेतला, पण तपास पथकाद्वारे त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती झाली, तेंव्हा सोनीचा अर्थात त्याच्या बायकोचा खून आपणच केल्याचे त्याने कबुल केले होते. आपली मर्जी सांभाळत नव्हती म्हणून दारूच्या नशेत आपण हे कृत्य केल्याचे मोहन भिल याने सांगितले. मोहन भिल याचा कबुली जबाब कॅमेराबद्ध आणि शब्दबद्ध होताच त्याच्या हातात बेड्या ठोकून त्याच्याविरूद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## आंतरजातीय 'लव्ह स्टोरी'वर पडदा...

प्रेमसंबंध निर्माण झाले होते. ती मुलगी त्याचा मित्र राकेश पाटील याची चुलत बहिण होती. आपला मित्रच आपल्या चुलत बहिणीबरोबर प्रेमसंबंध निर्माण करतो तिला फुस लावतो याची कुणकुण राकेश पाटील याला लागलेली होती. रहिमतुल्ला आणि त्या मुलीचे दोघांचे एकमेकावर मनापासून प्रेमसंबंध असल्याने ते दोघे ही भेटत होते. मोबाईलवरून एकमेकांशी चॅटिंग करीत होते, त्यामुळे त्याचे प्रेमसंबंध हे वाढीस लागलेले होते. त्या दोघांनी ही लग्न करण्याचा विचार केलेला होता. परंतु आपल्या लग्नाला दोघांच्या ही घरच्याकडून विरोध होणार हे दोघांना ही माहित होते. त्यामुळे ते दोघे ही पळून जावून लग्न करण्याच्या विचारात होते. त्या दोघांच्या प्रेमसंबंधाची चर्चा ही ते राहत असलेल्या ठिकाणी आणि मित्र परिवारात होत होती. तशी ही चर्चा राकेश याच्या काकाच्या कानावर आलेली होती. त्यांनी आपल्या मुलगीला समजावून सांगण्याचा बराच प्रयत्न केला होता. परंतु ती लग्न करणार तर रहिमतुल्लाशीच करणार असे तिने आपल्या घरच्या लोकांना सांगितले होते.त्यामुळे त्यांनी आपल्या मुलीवर दबाब आणण्याचा प्रयत्न करून तिचे लग्न आपल्या नात्यातील एका मुलाशी लावून देण्याची तयारी सुरू केली होती. त्यामुळे ती मुलगी आणि रहिमतुल्ला दोघे ही सजग झालेले होते. रहिमतुल्लाने ही आपल्या घरी आपण त्या मुलीशी लग्न करणार असल्याचे सांगितले असल्याने त्याच्या घरच्या लोकांनी ही त्याला यासाठी विरोध केलेला होता. तशातच दोघांची जात वेगवेगळी असल्याने आपल्या मुलीने जर रहिमतुल्लाशी लग्न केले तर आपल्या घराण्याची पार अब्रु इज्जत जाईल असे त्यांना वाटत होते. यातच या प्रकरणी राकेश पाटील यांने लक्ष घातल्याने त्याने एकदा दोनदा रहिमतुल्ला आतार याला भेटून त्याला चांगलाच दम देवून परत माझ्या बहिणीच्या नादाला लागलास तर त्याचे परिणाम वाईट होतील, तिला जर तु आपल्या नादाला लावलास तर तुला मारूनच टाकतो अशी धमकी ही त्याने दिलेली होती. रहिमतुल्ला ही चांगला तयारीचा असल्याने त्याने राकेशला तुला काय करायचे तर कर जा मी लग्न तर तुझ्या बहिणीशीच करणार आहे आणि तुम्ही तिचे लग्न दुसरीकडे कसे लावून देता ते मी बघतोच असे सांगितले होते. त्यामुळे राकेश पाटील हा त्याचेवर चिडून होता. रहिमतुल्ला हा सांगून ही ऐकत नाही, त्याच्यामुळे आपल्या कुटुंबाची बदनामी होणार आहे त्याला चांगला धडा कायमचा शिकवाला पाहिजे या विचारात तो होता. त्याने ही गोष्ट आपले काका आणि मित्रांना सांगितली होती. त्याच्या मित्रांना ही रहिमतुल्ला याचे राकेश पाटील याच्या बहिणीसोबत असलेले प्रेमसंबंध माहिती होते. हल्लीची तरूण पिढी ही खटक्यावर बोट आणि जागेवर पलटी असे वागत असल्याने एखाद्या प्रकरणाचा सोक्ष मोक्ष लावायचा म्हटले की, ते लागलीच कामाला लागतात.त्यात असे नाजुक प्रकरण म्हटले की, समोरच्याला बरोबर कसा अडकवायचे याचा ते पध्तशीर विचार करतात. राकेश पाटील याने रहिमतुल्ला याला समजावून सांगून ही तो त्याच्या बहिणीचा नाद सोडत नव्हता. त्यामुळे रहिमतुल्ला याला आपल्या मित्रांच्या मदतीने बरोबर धडा शिकवायचा म्हणजे तो ताळ्यावर येईल असे त्याला वाटले. म्हणून त्याने आपल्या सहा सात मित्रांना बरोबर घेतले. त्याची दारूची जेवणाची सोय केली. रहिमतुल्ला आतार हा सारखा कराडला कामासाठी त्याच्या दुचाकीवरून जातो हे त्यांना माहित होते. तो कधी कराडला जाणार आहे याची त्यांनी माहिती काढली. सोमवार दि.५ मे रोजी तो कराडला जात असल्याची माहिती मिळाल्याने राकेश पाटील आणि त्याचे मित्र सतर्क झाले. सोमवार दि.५ मे रोजी रहिमतुल्ला हा दुचाकी गाडीने कराडला जात असताना वाळवा तालुक्यातील वाठार गावच्या हद्दीत राकेश पाटील आणि त्याचे मित्र चार चाकी गाडी घेऊन त्याचा पाठलाग करीत तेथे आले. राकेशने त्याला भाडखाऊ तुला कितीवेळा सांगायचे की,माझ्या बहिणीच्या नादाला लागू नकोस म्हणून तुला किती वेळा सांगितले तरी तु ऐकत नाहीस थांब तुला आता जन्माची अद्दल घडवितो असे म्हणत त्याच्या गाडीच्या आडवी गाडी लावली. आपली चार चाकी गाडी त्याच्या दुचाकीच्या आडवी घालत त्याला अडविले. त्याला त्याच्या गाडीवरन खाली पाडत सगळयाजणांनी रहिमतुल्ला याला मारहाण करीत चार चाकी गाडीत घातले. त्याचे अपहरण करून त्याला तेथून दुसरीकडे नेवून परत लाकडी दांडके, लोखंडी रॉडने आणि पीव्हीसी पाईपने जवळपास दोन तीन तास मारहाण करीत त्याच्याकडून परत आपल्या बहिणीच्या नादाला लागणार नाही असे वदवून घेतले.त्यांनी केलेल्या मारहाणीत राहिमतुल्ला हा जबर गंभीर जखमी झाला होता. संध्याकाळी पाच वाजणेच्या दरम्यान राकेश पाटील आणि त्याच्या मित्रांनी रहिमतुल्ला आतार याला कासेगाव येथील त्याच्या घराजवळ आणून सोडले. खाद्या हिंदी चित्रपटाला शोभावा असा प्रसंग त्यांनी केला होता. त्यांनी केलेल्या मारहाणीने तो वेदनेने विव्हळत होता.त्याला नीट धड चालता येत नव्हते. तो कसा बसा घरात गेला.त्याला त्याच्या घरच्या लोकांनी काय झाले म्हणून विचारले असता त्याने घडलेला सगळा प्रसंग सांगून राकेश पाटील आणि त्याच्या मित्रांनी आपल्याला मारहाण केल्याच सांगितले. त्यावेळी त्याच्या घरच्यांनी त्याला कासेगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेले. त्याची गंभीर अवस्था पाहून तेथील डॉक्टरांनी त्याला अगोदर कासेगाव पोलीस स्टेशला जावून तक्रार देण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याने राकेश पाटील आणि त्याच्या मित्रांच्या विरोधात मारहाणीची तक्रार कासेगाव पोलीसात दिली. कासेगाव पोलीसांनी त्याची तक्रार दाखल करून घेऊन त्याला परत वैद्यकीय तपासणीसाठी कासेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवून दिले. तेथे त्याची प्रकृती खालावल्याने त्याच्या नातेवाईकांनी त्याला उपचारासाठी कराड येथील कृष्णा रुग्णालयात नेले. तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याचा मृत्यु झाला. कृष्णा रुग्णालयातील डॉक्टरांनी या घटनेची माहिती कराड ग्रामीण पोलीसांना दिली. कराड ग्रामीण पोलीसात या घटनेची फिर्याद मयत रहिमतुल्ला याच्या भावाने दिल्याने पोलीसांनी या घटनेचा तपास चालू केला. पोलीस निरी. महेंद्र जगताप यांनी या घटनेची तातडीने दखल घेऊन संशयीत आरोपीच्या शोधासाठी पोलीसांची दोन पथके तयार केली.तसेच या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस करीत असताना या घटनेतील संशयीत आरोपी हे कासेगाव परिसरात लपून बसल्याची माहिती पोलीसांना मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पोलीसांनी या घटनेतील संशयीत राकेश रामदास पाटील, सुदाम मोहन पवार, अमर सुरेश खोत, विराज युवराज तोडकर, उमेश रविंद्र पाटील,विशाल हणमंत शिद, ऋषीकेश धनाजी तोडकर यांना ताब्यात घेऊन कराड ग्रामीण पोलीसांच्या ताब्यात दिले. घटनास्थळी कराडचे पोलीस उपाधिक्षक अमोल ठाकुर, इस्लामपुर पोलीस उपाधिक्षक मंगेश चव्हाण यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. राकेश पाटील याने गुन्हा कबुल करीत रहिमतुल्ला आतार याचे आपल्या चुलत बहिणीसोबत प्रेमसंबंध असल्याने आणि त्या प्रेमसंबंधाला आपल्या घरच्या लोकांचा विरोध असल्याने आपण आणि आपल्या मित्रांनी त्याला लाकडी दांडके,लोखंडी रॉडने आणि पीव्हीसी पाईपने मारहाण केली असल्याचे सांगितले. मयत रहिमतुल्ला आतार याच्या भावाने दिलेल्या फिर्यादी नुसार रहिमतुल्ला सलीम आतार (वय २७) रा.कासेगाव याचे अपहरण करून मारहाण करीत त्याचा खून केल्या प्रकरणी राकेश रामसाद पाटील (वय२ ६), सुदाम मोहन पवार (वय २७), अमर सुरेश खोत (वय २७), विराज युवराज तोडकर (वय २६), उमेश रविंद्र पाटील (वय २८), विशाल हणमंत शिद (वय २३) आणि ऋषीकेश धनाजी तोडकर (वय २६) रा.सर्वजण कासेगाव याच्या विरोधात कराड ग्रामीण पोलीसात भा.दं.वी.कलम १०१(१) आणि इतर कलमानुसार गुन्हा दाखल केला.त्यांना कराड येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर बुधवार दि.७ मे रोजी पोलीसांनी उभे केले असता मा.न्यायालयाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली कार, लाकडी दांडके, लोखंडी रॉड आणि पीव्हीसी पाईप जप्त केले. या घटनेचा पुढील तपास कराड तालुका पोलीस स्टेशनेचे पोलीस निरी महेंद्र जगताप याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत. आजच्या तरूण पिढीला प्रेमाची परिभाषाच समजली नसल्याने ती प्रेमसंबंधात वाहवत जात आहे.त्यातून जात आडवी आली की, मग त्याच्या त्या प्रेमसंबंधाला विरोध होऊन खूनासारखी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## दारुडा पती डोकेदुखी ठरला...

घासत असताना शिवीगाळ करून त्याने प्रणितासोबत भांडण काढले. प्लास्टिकच्या पाइपने मारहाण करायला सुरुवात केली. त्यामुळे प्रणिताने रागाच्या भरात घरातील सुरीने त्याच्या गळ्यावर वार केल्यामुळे तो रक्ताच्या थारोळ्यात पडला. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक अजय सिंदकर यांनी सहकाऱ्यांसह लिंगनूरला धाव घेतली. स्वयंपाकगृहात रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या रमेशला उपचारासाठी येथील उपजिल्हा रुग्णालयाकडे नेले; परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. त्याच्या पश्चात पत्नी, आई, मुलगा, मुलगी, भाऊ असा परिवार आहे. घटनास्थळी डीवायएसपी रामदास इंगवले यांनीही भेट दिली. नातेवाइकांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवण्याचे काम रात्री उशिरापर्यत सुरू होते. कारणांचा शोध सुरूरमेश हा प्लास्टिकच्या पाइपने मारहाण करीत असताना झटापटीत आपल्या हातातील सुरी त्याच्या गळ्याला लागली. जिवे मारण्याच्या उद्देशाने वार केलेला नाही, असे सांगितल्यामुळे पोलिसांनी प्रणिताला ताब्यात घेतले आहे. वेगळे काही कारण आहे का, याचीही चौकशी सुरू असून शवविच्छेदन अहवाल आणि मोबाइलमधील तांत्रिक माहितीवरून तपासाला दिशा मिळेल, असे पोलिस निरीक्षक सिंदकर यांनी सांगितले.

पान ८ वरून....

## संत विचारच मानवाला लोभ ...

सहभागी झाल्या होत्या. सात दिवस चाललेल्या सप्ताहाची सांगता गावात सकाळी दिंडी काढून मोठ्या उत्साहात करण्यात आली. संपूर्ण सप्ताहात हभप बाबा महाराज बोराडे, हभप भगवान महाराज कराड, हभप महादेव महाराज बोराडे, हभप उद्धव महाराज, हभप आप्पा महाराज चौरे, हभप प्रभाकरनाना महाराज व हभप बालयोगी हरिहर महाराज दिवेगावकर यांनी श्री संत तुकोबारायांचे जीवन चरित्रावर विचार मांडले. हरिनाम सप्ताह यशस्वीतेसाठी राजेश कराड व त्यांच्या सहकार्यांनी परिश्रम घेतले.

## गडचिरोली लवकरच सर्वाधिक समृद्ध ...

धातुशास्त्र या विषयांकरिता जगात दुसऱ्या क्रमांकाचे विद्यापीठ असलेल्या कर्टीन विद्यापीठाशी सहकार्य करार केल्यामुळे आजचा दिवस गोंडवाना विद्यापीठाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिल्या जाईल असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. ऑस्ट्रेलियासोबत सामंजस्य करार करण्याची एकाच आठवड्यात ही दुसरी वेळ आहे असे सांगून मुंबईत झालेल्या 'वेव्हज' शिखर परिषदेच्या वेळी पश्चिम ऑस्ट्रेलिया येथील विद्यापीठासोबत नवी मुंबई येथे कॅम्पस स्थापन करण्याबाबत करार झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. गडचिरोली येथील विद्यापीठाचा लॉइड्स स्टील तसेच कर्टीन विद्यापीठासोबत तंत्रज्ञान शिक्षण संस्था स्थापन करण्याबाबत करार झाल्यामुळे राज्यातील उद्योगाला उत्तम दर्जाचे मनुष्यबळ मिळण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे ज्ञानाची कवाडे उघडली असून देशाबाहेरील विद्यापीठांना राज्यात कॅम्पस स्थापित करण्याचे दृष्टीने नवी मुंबई येथे 'एज्युसीटी' निर्माण करण्यात आली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. जगातील १२ नामवंत विद्यापीठांनी आपापले कॅम्पस एज्युसीटी नवी मुंबई ठिकाणी उघडण्यास मान्यता दिली असून यॉर्क, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया व इलिनॉईस विद्यापीठांनी अगोदरच तेथे कॅम्पस सुरु केले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नवी मुंबई एज्युसीटी येथे सर्व प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे कॅम्पस स्थापन झाल्यावर त्याठिकाणी ८०,००० ते एक लाख विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण घेता येईल असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले. लॉइड्स स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक प्रभाकरन यांचे कौतुक करून त्यांनी धैर्य दाखविल्यामुळे गडचिरोली येथे एकात्मिक स्टील उद्योग सुरु करणे शक्य झाले असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले. स्थापनेपासून अवघ्या १२-१३ वर्षात गोंडवाना विद्यापीठाने चांगली प्रगती केली असे सांगून विद्यापीठाने तंत्रज्ञान संस्था सुरु केल्यामुळे तसेच कर्टीन विद्यापीठाशी सहकार्य केल्यामुळे संस्थेतून देशात खनिज उद्योग तसेच धातुशास्त्र या विषयातील उत्तम तज्ज्ञ तयार होतील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ऑस्ट्रेलियाचे मुंबईतील वाणिज्यदूत पॉल मर्फी, लॉईड्स स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक बी प्रभाकरन व गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ प्रशांत बोकारे यांनी मनोगत व्यक्त केले.

गडचिरोली येथे युवकांना धातुशास्त्र, खाणकाम व कॉम्प्युटर सायन्स व अन्य विषयातील अभियांत्रिकी प्रशिक्षण देण्यासाठी स्वायत्त 'विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था' स्थापन करण्याबाबत गोंडवाना विद्यापीठ व लॉइड्स मेटल्स यांचेमध्ये करार करण्यात आला. तर गोंडवाना विद्यापीठ व पश्चिम ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठ यांचेमध्ये उभयपक्षी पदवी (ट्विनिंग डिग्री) प्रदान करण्याबाबत करार करण्यात आला. कार्यक्रमाला माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार डॉ.परिणय फुके, कर्टीन विद्यापीठाचे प्रकुलगुरु मार्क ऑग्डन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, तसेच विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.

12 TO 18 MAY 2025 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 5/11/2025 5:05 PM Page 1



# ऍनीमल बर्थ कंन्ट्रोल सेंटरच्या नावावर नागरिकांची फसवणूक



**विरार/प्रतिनिधी**

ऍनीमल बर्थ कंन्ट्रोल सेंटरच्या नावावर नागरिकांना गुंतवणूक करण्यास सांगून लाखोंची फसवणूक करणाऱ्या आरोपीला बोळींज पोलिसांनी पुण्याच्या कोथरूड परिसरातून ताब्यात घेत अटक केल्याची माहिती बोळींज पोलिसांनी दिली आहे. विशेष म्हणजे आरोपीला त्याच्या मर्सडीज कारच्या नंबर व रंगावरून पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीने नागरिकांना मेनका गांधींचा धाक दाखवून ही लाखोंची फसवणूक केल्याचे पोलीस तपासात पुढे आले आहे. विरारच्या गोकुळ टाऊनशीप येथील ओम शिवम सोसायटीत राहणाऱ्या हरेन राठोड (३९) यांची १७ ऑक्टोबर २०२३ ते १४ एप्रिल २०२५ पर्यंत गुंतवणूकीच्या नावावर लाखोंची फसवणूक झाली होती. आरोपी हर्षवर्धन चौधरीने विरार, नाशिक व जळगाव येथे ऍनीमल बर्थ कंन्ट्रोल सेंटरमध्ये गुंतवणुक करण्याचे बहाण्याने त्यांच्याकडून ८ लाख १५ हजार रुपये व साक्षीदार सुनिता परमार यांचेकडुन ३ लाख ६८ हजार ५०० रुपये असे एकुण ११ लाख ८३ हजार ५०० रुपये घेतले होते. सदर ठिकाणी ऍनीमल बर्थ कंन्ट्रोल सेंटर न खोलता त्यांच्याकडून विश्वासाने घेतलेले पैसे परत न करता फसवणुक केली होती. तसेच आरोपीने त्यांना शिवीगाळी करुन खोटया गुन्हयात अडकवण्याची धमकी दिली होती. याप्रकरणी बोळींज पोलिसांनी १४ एप्रिलला गुन्हा दाखल केला होता. याप्रकरणी बोळींजचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे यांनी गुन्ह्याचा तपास करून आरोपीला अटक करण्याच्या सूचना तपास अधिकारी व सपोनि रुपेश दळवी व त्यांच्या टीमला दिल्या होत्या. आरोपीच्या शोधात असताना पोलिसांना तो पुण्यात असल्याची माहिती मिळाली. शुक्रवारी तपास अधिकारी रुपेश दळवी व त्यांची टीम पुण्याला रवाना झाली होती. आरोपीच्या मर्सडीज गाडीचा नंबर आणि रंग यावरून कोथरूड येथील चांदणी चौकातील एका इमारतीमधून हर्षवर्धन चौधरीला पकडले. आरोपीला शनिवारी वसई न्यायालयात हजर केल्यावर चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपीला अटक केल्याची माहिती मिळाल्यावर फसवणूक झालेल्या ४ ते ५ नागरिकांनी वसई न्यायालयात येऊन बोळींज पोलिसांचे अभिनंदन केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने मेनका गांधी यांच्या नावाने मुंबईसह आजूबाजूच्या राज्यात दहशत केली होती. आरोपी त्यांचे नाव वापरून पोलिसांवर दबाव आणायचा व पोलीस ठाण्यात प्राण्यांचे गुन्हे दाखल करायचा. मेनका गांधी माझ्या खास असून त्यांनीच ऍनीमल बर्थ कंन्ट्रोल खोलण्यासाठी सांगून लोकांची लाखो रुपयांची व प्राणी प्रेमींच्या भावनांशी खेळून फसवणूक केली आहे. आरोपीवर सध्या बोळींज, खार आणि पार्कसाईट पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असून फसवणूक झालेल्या नागरिकांनी संपर्क साधण्याचे आवाहन बोळींज पोलिसांनी केले आहे.

## जिल्हा परिषद पालघर येथे महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पालघर येथे क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा डॉ. रूपाली सातपुते आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी इजाज अहमद शरीख मसलत यांच्या हस्ते दोघांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे आणि जिल्हा पशू संवर्धन अधिकारी डॉ.प्रकाश हसनाळकर यांनी या थोर महापुरुषांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, बसवेश्वरांनी समतेचा, सामाजिक न्यायाचा आणि श्रमसन्मानाचा संदेश दिला. तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगिता'च्या माध्यमातून ग्रामीण समाजाचे मनोबल वाढवले आणि स्वच्छतेपासून ते राष्ट्रनिर्मितीपर्यंत योगदान दिले.कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि विविध विभागांतील प्रतिनिधी उपस्थित होते. या जयंतीनिमित्त सामाजिक मूल्यांचे स्मरण करत कार्यकर्त्यांनी त्यांचे विचार आचरणात आणण्याचा संकल्प केला.

## जागृती बौद्ध मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अनोख्या पद्धतीन साजरी

**वसई/प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात व अनोख्या पद्धतीने जागृती बौद्ध मंडळ, कामन मोरी, डोंगरीपाडा कोल्ही, चिंचोटी व पाए गाव यांच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी बाबासाहेबांच्या डिगऱ्यांचे डिझाईन केलेले ३२ केक स्थानिक ज्येष्ठ महिलांच्या हस्ते कापून हा उत्सव अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, असे मंडळाचे अध्यक्ष नवीत भोईर यांनी सांगितले. याप्रसंगी मान्यवरांचा देखील सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ. गौतम गोसावी, डॉ. डी एस सावंत, डॉ. तेजस्विनी गोसावी, अशोक बंडे आरपीआय ठाणे पालघर प्रदेश सचिव, भाजपाचे केदारनाथ म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य कृष्णा माळी, कमलाकर जाधव, माजी सरपंच दिनेश म्हात्रे, पोमण गावचे सरपंच आत्माराम ठाकरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. जागृती बौद्ध मंडळातर्फे दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी पोमण येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी साडेदहा वाजता बुद्ध वंदना करण्यात आली. त्यानंतर संध्याकाळी चार ते आठ वाजेपर्यंत चिंचोटी नाका ते मोरेगाव पर्यंत बाईक रॅली काढण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. रात्री ९.०० वाजता बाबासाहेबांच्या जीवनावर मनोगत व्यक्त करण्यात आले. गावातील समाजातील ज्येष्ठ महिला यांच्यामार्फत बाबासाहेबांच्या ३२ डिग्र्यानी सजविलेले केक कापण्यात आले. अशाप्रकारे बाबासाहेबांच्या स्मृती व आठवणींना उजाळा देऊन व कृतज्ञ व मानवंदना देऊन बाबासाहेबांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होऊन मोठ्या उत्साहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती जागृती बौद्ध मंडळातर्फे साजरी करण्यात आली असे अध्यक्ष नवीत भोईर यांनी सांगितले.

## आयसीयू सुविधेअभावी नवजात बालकाचा मृत्यू



**मोखाडा** : किनिस्ते ग्रामपंचायतीमधील योगिता पुजारी या गर्भवतीने मोखाडा ग्रामीण रुग्णालयात २५ एप्रिल रोजी एका सुदृढ बालकाला जन्म दिला. जन्मावेळी बालकाचे वजन तीन किलो असल्याचे सांगितले. मात्र, यानंतर सायंकाळी त्या बालकाला श्वास घेण्यास अडचण निर्माण झाल्याने जव्हार कुटीर रुग्णालय येथे हलविले. तेथेही आयसीयू सुविधा किंवा त्या बालकाला वाचवू शकेल अशी यंत्रणा उपलब्ध नसल्याने नाशिक येथे नेले. मात्र, नाशिक जिल्हा रुग्णालयात पोहोचताच काही मिनिटांतच त्या बालकाला मृत घोषित केल्याचे पालकांनी सांगितले. यामुळे आयसीयू सुविधेअभावी १०० किमीचा प्रवास करावा लागला, जर सुविधा जिल्ह्यात उपलब्ध असती तर बालकाचा प्राण वाचला असता, अशी खंत जिल्ह्यातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या घटनेने जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्या बालकाला श्वास घेण्यास त्रास झाल्याने जव्हार येथे हलविले होते, मात्र येथेही त्याला ऑपरेट करणे शक्य न झाल्याने पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलविले. यावेळी रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली होती. मात्र, कदाचित श्वासनलिका आणि हृदयासंबंधी काही आजार जन्मत असावेत असा अंदाज आहे, असे मोखाडा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. भरत महाले यांनी सांगितले.

## सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त नालासोपाऱ्यात माजी विद्यार्थी मेळावा संपन्न



**नालासोपारा/प्रतिनिधी**

सोपारा इंग्लिश स्कूल, सोपारा, नालासोपारा पश्चिम वर्ष १९७५ नवीन अभ्यासक्रम (दहावी) एसएससीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने, पहिल्या बॅचचा माजी विद्यार्थी मेळावा मंगळवार, २९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आला होता. या विद्यार्थी पुनर्मिलन कार्यक्रमात, सर्व विद्यार्थी आणि तत्कालीन शिक्षक एस.वाय. महाजन सर यांच्यासह त्यांच्या पत्नी आणि शिक्षिका कमल पाटील – सावे मॅडम आणि वनिता चौरसिया मॅडम, तसेच शाळेच्या विद्यमान प्राचार्या घोन्साल्विस मॅडम, पर्यवेक्षक किशोर पवार सर, तसेच शाळेचे इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेच्या कोषाध्यक्षा डॉ. प्राजक्ता समेळ, संस्थेचे सचिव श्री. राहुल गव्हाणकर आणि योगगुरू राजाभाऊ नाईक उपस्थित होते. प्रारंभी चौरसिया मॅडम यांनी सोपारा मराठी शाळेतील छत्रपती शिवाजी महाराज व संघ संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. जेवणानंतर सर्व विद्यार्थी १९७५ मध्ये ज्या वर्गात एसएससीला बसले होते त्याच वर्गात एकत्र बसले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. यानंतर सर्व मान्यवरांनी दिप प्रज्वलन केले आणि सरस्वती देवीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यानंतर, सर्व दिवंगत शिक्षक आणि वर्गमित्रांना तसेच काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन करताना प्रभाकर नाईक यांनी सर्व मान्यवरांची ओळख करून दिली आणि त्यांचे स्वागत केले.

ते म्हणाले की, महाजन सरांनी आपल्या गणितीय विज्ञानाचा पाया घातला, तर दिवंगत गोसावी सरांनी तो शिखरावर नेला. प्रभाकर नाईक यांनी तत्कालीन शिक्षिका कमल पाटील मॅडम आणि चौरसिया मॅडम यांच्यासह शाळेतील सर्व उपस्थित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. योगगुरू राजाभाऊ नाईक यांनी प्रौढांच्या आरोग्याविषयी चांगली माहिती दिली. जेवणाचा आस्वाद घेतल्यानंतर सर्वजण मनोरंजन कार्यक्रमात सहभागी झाले. आमचे सहपाठी डॉ. ओमप्रकाश दुबे यांनी शालेय जीवनातील त्यांचे आणि इतरांचे अनुभव सांगून सुमारे एक तास सर्वांना हसवले. अधिवक्ता नितीन म्हात्रे यांनीही त्यांचे अनुभव सांगितले. शाळेच्या विश्वस्तांनी सर्व विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला. शेवटी महाजन सर, पाटील मॅडम, चौरसिया मॅडम यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या आणि आशीर्वाद दिले. शाळेच्या मुख्याध्यापिका घोन्साल्विस मॅडम यांनीही आपले विचार व्यक्त केले. वसंत पाटील व चंद्रकांत जोशी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. शेवटी, आभार मानून आणि पुन्हा भेटण्यासाठी सर्वांच्या संमतीने कार्यक्रम समाप्त झाला.

## चोरी गेलेला ४९ लाख २६ हजारांचा मुद्देमाल पालकमंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांच्या हस्ते फिर्यादीना साभार केला परत!



**लातूर/प्रतिनिधी**

जिल्हाभरात घडलेल्या विविध गुन्ह्याची उकल करून गुन्हेगारांकडून जप्त केलेला जवळपास ४९ लाख २६ हजार ९३ रुपये किंमतीचा मुद्देमाल पालक मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांच्या हस्ते फिर्यादीना साभार परत करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयातील डीपीडीसी हॉलमध्ये पार पडलेल्या छोटेखाणी कार्यक्रमात लातूर जिल्हयातील मागील एका महिन्यात चोरीच्या गुन्हयातील गुन्हेगाराकडुन हस्तगत केलेला किंमती मुद्देमाल व नागरीकांची ऑनलाईन फसवणुक झालेली रक्कम पालकमंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांचे हस्ते नागरीकांना साभार परत देण्यात आले यामध्ये चोरी, घरफोडी अशा ०७ गुन्हयातील किंमती मुद्देमाल सोने, चांदी व रोख एकुण किं. ९,४१,०६५/- वाहन चोरी ०३ गुन्हयातील मोटार सायकल व ट्रॅक्टर असा मुद्देमाल एकुण किंमत २,७२,०००/- मोबाईल चोरीचे ३३ मोबाईल फोन एकूण किंमत. ४,०८,४९९/- ऑनलाईन फसवणुक झालेली १६ गुन्हयातील रोख रक्कम एकुण ३३,०४,५२९/- असा एकुण ०९ पोलीस स्टेशन अंतर्गत ५९ गुन्हयातील किंमती मुदेमाल, वाहने, मोबाईल व रोख रक्कम असा मुद्देमाल फिर्यादीस परत देण्यात आला. एकुण ४९,२६,०९३/- हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल फिर्यादीस परत देण्यात आले आहे. तसेच माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये मा.पोलीस उपमहानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे वार्षीक तपासणी दरम्यान लातूर जिल्हयातील एकुण ६४ गुन्हयातील एकुण ६८,१५,०२१/- रुपये किमतीचा मुद्देमाल (सोने, चांदी, मो.सा, मोबाईल फोन, रोख) मा. पोलीस उपमहानिरीक्षक, नांदेड – परिक्षेत्र नांदेड यांचे हस्ते नागरीकास/तक्रारदारास परत देण्यात आला आहे. लातूर जिल्हयात सन २०२५ मध्ये वर नमुद प्रमाणे एकुण १२३ गुन्हयातील एकुण १,१७,४१,११४/- किंमतीचा मुद्देमाल गुन्हेगाराकडुन हस्तगत करण्यात लातूर पोलीस दलास मोठे यश आले आहे. तसेच सदरचा चोरीचे गुन्हयातील मुद्देमाल नागरीकास, तक्रारदारास तात्काळ परत करण्यात आला आहे.

## वसईतील रेव्ह.फादर विल्यम फरेरा यांचा सत्कार



**वसई/प्रतिनिधी**

रेव्ह. फादर विल्यम फरेरा यांच्या धर्मगुरूपदाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त त्यांनी रमेदी चर्च येथे आभाराची मिस्सा अर्पण केली. यावेळी रमेदी चर्चचे प्रमुख धर्मगुरू व रमेदी माता तीर्थस्थानाचे रेक्टर रे.फा. एरिक आल्फान्सो व सहाय्यक धर्मगुरू फा. मॉर्गन फर्नांडीस यांनी फा. विल्यम यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला. फादर विल्यम फरेरा हे दि. १ जून २००७ ते ३१ मे २०१३ या कालवधीत रमेदी चर्चचे प्रमुख धर्मगुरू व तीन वर्षे निवासी धर्मगुरू म्हणून कार्यरत होते. त्याचप्रमाणे धर्मगुरू म्हणून सांताक्रूझ कलिना, मानखुर्द, उत्तन, सांडोर, शिर्लयवाडी, उत्तन डोंगरी, निर्मळ, गिरीज, सेंट जेम्स चर्च व आता सेंट गोन्सालो गार्सिया चर्च, बरामपूर येथे कार्यरत आहेत. आपल्या अध्यात्म्याची व सेवेची कारकीर्द बहरावी, फुलावी व सुगंधित व्हावी तसेच प्रभू परमेश्वराची सुवार्ता घोषविण्याचे त्यांचे कार्य सदोदित चालू राहावे, अशा शुभेच्छा उपस्थित भाविकांनी दिल्या. फा. विल्यम फरेरा यांचा धर्मगुरूपदाचा सुवर्ण महोत्सव व त्यांचे बंधू फादर स्टॅनी फरेरा यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त मंगळवार दि. ६ मे २०२५ रोजी संध्या. ६ वाजता मेरी मॅग्दलेना चर्च, मुळगाव येथे वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोजा आभाराची मिस्सा अर्पण करतील. त्यानंतर त्यांचा जाहीर सत्कार आयोजित केला आहे. मिस्सा व कार्यक्रमाकरीता सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन दोन्ही फादरांनी केले आहे.

# थोडक्यात वृत्तांत

### आरोग्य शिबिराचा नागरिकांनी घेतला लाभ

लातूर : आरोग्य विभाग, लातूर शहर महानगरपालिका लातूर यांच्यावतीने शहरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने नियोजन आयुक्त देविदास जाधव व उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या वतीने केले जात आहे. त्यानुसार उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या संकल्पनेतून प्रत्येक दवाखाना अंतर्गत दर महिन्याच्या २९ व ३० तारखेला सार्वजनिक ठिकाणी व वॉर्ड मधे आरोग्य शिबिर घेण्यास सुरुवात झाली आहे . परंतु , मागील महिन्यात काही शिबिर झाली नसल्याने ०९ में २०२५ रोजी एकूण १४ ठिकाणी आरोग्य शिबीर घेण्यात आले व त्यात तब्बल ८६७ रुग्णांची तपासणी करण्यात आले. मनपा आरोग्य विभागा अंतर्गत कार्यन्वित असलेले एकूण ३२ आरोग्य केंद्र येथे दैनंदिन आरोग्य सेवा सुविधा नागरिकांना मनपा देत असते.. परंतु शासकीय योजना व आरोग्य सुविधा अधिकाधिक नागरिकान पर्यंत पोचवण्याचा दृष्टीने संबंधित दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात दरमहा शिबिर घेऊन किमान १०० रुग्णांची तपासणी करण्याचे निर्देश उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी विभागास दिले आहेत. त्यानुसार आरोग्य विभागाने प्रत्यक्ष वॉर्ड मधे कैंप घेऊन यावेळी एकूण १४ आरोग्य केंद्र मार्फत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते दि. ०९ में २०२५ रोजी आरोग्य शिबिरामध्ये एकूण ८६७ रुग्णाची वैद्यकीय तपासणी करून मोफत औषध उपचार करण्यात आले.या सर्व रुग्णांना या शिबिराचा लाभ झाला असून रक्तदाब, मधुमेह रुग्णचे निदान व महाविद्यालयीन विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे .या शिबिरास मनपा उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती यांनी भेटी देऊन आढावा घेतला. सदरील आरोग्य शिबिर एप्रिल महिन्यापासून दरमहा नियमित पणे शहराच्या वेगवेगळ्या भागात होणार असल्याने मनपाच्या आरोग्य सेवा अधिकाधिक नागरीकापर्यंत पोचवता येतील व या आरोग्य शिबिराचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे.

### कार्ला येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाची भेट

किल्लारी : कार्ला येथील विनोद विरपक्ष लामतुरे आणि सिरसल येथील अमोल अनिल हांडे या आत्महत्या ग्रस्त कुटुंबाची वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष निलेश हेलोंडे पाटील यांनी भेट घेऊन चौकशी केली. यावेळी तहसीलदार घनशाम अडसूळ , तालुका कृषी अधिकारी ढाकणे, किल्लारी मंडळ अधिकारी एस. के. गवळी आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आत्महत्या ग्रस्त कुटुंबासाठी विविध शासकीय योजनांचा लाभ, योजना प्राधान्याने देण्यात याव्यात याबाबत संबंधित विभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांना सूचना हेलोंडे पाटील यांनी दिल्या. यावेळी ग्राम महसूल अधिकारी सदाशिव हेंबाडे, विजयकुमार उस्तुरे, ग्रामसेवक महादेव गिरी व जगन्नाथ गिरी, बालाजी जगताप, कृषी सहायक शषिकांत फावडे, सिरसलचे माजी सरपंच प्रकाश पाटीलसह अंगणवाडी कर्मचारी तसेच इतर विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### वाघोली पाटीवर अपघातात एक जण ठार

औसा : उमरगा – लातूर राष्ट्रीय महामार्गावर वाघोली पाटीवर तीन वाहनांचा अपघातात एक जण ठार झाल्याची घटना घडली आहे. या विषयी माहिती की, सास्तूर– माकणी येथील रमजान महंमद ताहेर कुरेशी हे दुपारी आपल्या दुचाकीवरून (एमएच २४, एपी ८३४६) औश्याकडे जात होते. दरम्यान त्यांची दुचाकी उमरगा – औसा मार्गावरील वाघोली पाटीवर आली आसता. रमजान कुरेशी यांच्या दुचाकीला पाठीमागून येणाऱ्या कारने दुचाकीला धडक दिली. त्याचवेळी लामजन्याकडे जाणाऱ्या ट्रकच्या चाकाखाली रमजान महंमद ताहेर कुरेशी दुचाकीसह पडले. या अपघातात रमजान कुरेशी जागीच ठार झाला. या प्रकरणी किल्लारी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्रान पोलिसांनी ट्रक व दुचाकी किल्लारी पोलिसांनी ठाण्यात आणून लावल्याचे बिट अंमलदार कमाल शेख यांनी सांगितले. दरम्यान रमजान महंमद ताहेर कुरेशी यांच्या पत्नीवर सोलापुरातील रुग्णालयात उपचार सुरू असल्याने त्यासाठी लागणाऱ्या पैशांची तडजोड करण्यासाठी ते आपल्या औशातील मामाकडे येत होते. दरम्यान, वाघोली पाटी येथे तीन वाहनांच्या अपघातामध्ये त्यांचा मृत्यू झाला.

### गोमांस विक्री करणाऱ्यांवर कारवाई

भाईंदर : काशीमीरा येथे टेंपोमध्ये गोमांस विक्रीसाठी घेवून जातांना पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत १६०० किलो गोमांस आणि एक टेम्पो ताब्यात घेतला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्गावरुन मिरा रोड येथे टेम्पोमधून अवैध प्रकारे गोमांस घेवून जाणार असल्याची माहिती बजरंग दलाचे रुपेश दुबे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी टेम्पोची माहिती घेवून टेम्पो काशीमीरा येथे पकडला. त्याची काशीगाव पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तात्काळ हजर होवून टेम्पोसह दोघांना ताब्यात घेतले. पोलिसांनी ३ लाख ८४ हजार रुपये किमतीचे अंदाजे १६०० किलो वजनाचे प्रति किलो २४० रुपये दराचे गोमांस आणि ४ लाख रुपये किंमतीचा एक टेम्पो जप्त केला आहे. टेम्पोतून गोमांस वाहतूक करत असताना चालक रेहान शकील शहा (१९) आणि प्रशांत अंकुश बर्डे (१९) (रा. तालुका संगमनेर जिल्हा अहिल्यानगर) या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलमासह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम विविध कलमा अंतर्गत काशीगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन शेडगे हे करत आहेत.

### भिवंडीतून तीन बांगलादेशींना अटक

ठाणे : भिवंडी शहरात वास्तव्य करणाऱ्या तीन बांगलादेशींना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याविरोधात शांतीनगर, कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत. याप्रकरणात पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. आसिफ आतिक शेख (२४), मोहम्मद आलीम अमजद खान (४०) आणि शरीफुल शेख (४१) अशी अटकेत असलेल्या बांगलादेशींची नावे आहेत. काही महिन्यांपूर्वी ठाणे आणि मुंबई पोलिसांनी अभिनेता सैफ अली खान याच्या हल्ल्याप्रकरणी एका बांगलादेशीला अटक केली होती. भिवंडी शहरातील टेमघर भागात अवैधरित्या बांगलादेशी वास्तव्यास असल्याची माहिती शांतीनगर पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी टेमघर परिसरात शोध घेऊन आसिफ आणि मोहम्मद या दोघांना ताब्यात घेतले.

# ३१ गोवंश बेकायदेशिररित्या कसायाला विक्री केल्याप्रकरणी उदगीर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक पुजारी यांना बडतर्फ करण्याची मागणी

**उदगीर/प्रतिनिधी**

३१ गोवंश बेकायदेशिररित्या कसायाला विक्री केल्याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांच्यावर विनाविलंब बडतर्फीची कार्यवाही करण्याची मागणी गोरक्षक ओम माळी, आदित्य शिंदे, ज्योतीराम क्षीरसागर यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात त्यांनी असे नमूद केले आहे की, दि. १८ मार्च २०२५ रोजी उदगीरच्या ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन छोटा हत्ती व आयशर टेम्पोमधून ३१ गोवंशाना अतिशय निर्दयीपणे कोंबून त्यांची तस्करी केली जात होती. त्याची माहिती गोरक्षकांनी उदगीर ग्रामीण पोलिसांना दिली होती. त्या माहितीनुसार पोलिसांनी चारही वाहने पकडून ३१ गोवंशही ताब्यात घेतले. मात्र गुन्हा दाखल केल्यानंतर कायद्यानुसार हे गोवंश गोशाळच्या कस्टडीत द्यावे लागतात. कोर्टाचा निकाल लागेपर्यंत हे गोवंश गोशाळेत ठेवणे बंधनकारक आहे. असे असतानाही उदगीर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांनी पकडण्यात आलेले ३१ गोवंशाना कोणत्याही गोशाळेत सोडण्याऐवजी ते कसायाला



विकल्याचे आरोपही गोरक्षकांनी केला आहे. पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांना जप्त केलेला मुद्देमाल व गोवंश न्यायालयाच्या अनुमतीशिवाय कोणाच्याही ताब्यात देण्याचा अधिकार नसतानाही ही बेकायदेशीर कृती करण्याचे काम केले आहे. अशा मनमानीपणे वागणाऱ्या अमानवी कृती करणाऱ्या राजकुमार पुजारी यांच्यावर तात्काळ गोवंश हत्याबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांच्यावर बडतर्फीची कार्यवाही करण्यात यावी, अशी आग्रही मागणीही सदर निवेदनात करण्यात आली आहे. याच प्रकरणी गोरक्षक ज्योतीराम क्षीरसागर, आदित्य शिंदे, ओम माळी यांनी लातूरच्या गांधी चौकात पाच दिवस आमरण उपोषण केले होते. या उपोषणाची दखल घेत आमदार अभिमन्यू पवार यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यासह सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृहावर पशु हत्याबंदी कायद्यांतर्गत बैठक बोलावली होती. या बैठकीतही दोषी पोलीस अधिकारी पुजारी यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली. पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनाही गोरक्षकांकडून एक निवेदन देण्यात आले. पालकमंत्र्यांनीही दोषींवर कठोर कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# भिवंडी वकील संघटनेच्या निवडणुकीत अँड.किरण चन्ने यांचा दणदणीत विजय



**भिवंडी/प्रतिनिधी**

चुरशीच्या झालेल्या भिवंडी वकील संघटनेच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनेलचे अँड किरण चन्ने यांनी दणदणीत विजय मिळविला आहे. अध्यक्ष पदासाठी बुधवारी झालेल्या निवडणुकीत अँड किरण चन्ने यांनी अँड मनजीत राऊत यांचा २०९ मतांनी पराभव केला आहे. अँड किरण चन्ने यांना ५७३, अँड मनजीत राऊत यांना ३६४ तर तिसरे उमेदवार अँड.सुनील पाटील यांना अवघ्या ४८ मतांवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीत कार्यकारी मंडळावर उपाध्यक्ष पदी अँड.सुधीर भोईर, सचिव पदी अँड.प्रदीप मते, सह सचिवपदी अँड.अफिफ मोमीन, खजिनदारपदी अँड.कल्पेश ठाकूर हे निवडून आले असून बार असोसिएशन सदस्यपदी अँड.प्रमोद भालेकर, अँड.चांदबी मुजावर, अँड.अतुल भालेराव, अँड.अनिल राठोड, अँड.लखन कांबळे तर महिला प्रतिनिधी म्हणून अँड.सपना भगत या विजयी झाल्या आहेत. अँड.किरण चन्ने यांच्या विजयानंतर न्यायालय परिसरात रात्री उशिरा वकिलांसह समर्थक कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष साजरा केला. भिवंडी वकील संघटनेच्या निवडणुकीत मिळविलेला विजय हा परिवर्तन शील विचारांचा विजय असून सर्व वकिलांनी केलेल्या सहकार्यातून ही शक्य झाले असल्याचे सांगत, सर्वांना सोबत घेऊन संघटनेचे काम पुढे करत राहणार अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित अध्यक्ष अँड.किरण चन्ने यांनी दिली आहे.

# भिवंडीतील नालेसफाई कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभागनिहाय पथकाची नियुक्ती, पालिका आयुक्तांनी घेतला नालेसफाईचा आढावा!





**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी पालिका क्षेत्रातील नालेसफाई प्रत्येक वर्षी वादाच्या भोवऱ्यात सापडलेली आहे. त्या पार्श्वभूमीवर पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी नालेसफाईच्या कामावर नियंत्रण ठेवण्या करता प्रभागनिहाय पथकांची नियुक्ती केली असून बुधवारी स्वतः नाले सफाईचा आढावा घेण्यासाठी भिवंडीतील विविध ठिकाणी भेटी दिल्या आहेत. पालिकेने यंदा प्रभाग समिती निहाय शहरातील सर्व बंदिस्त व उघड्या स्वरुपाचे लहान मोठे १३५ नाल्यांमधील गाळ व केरकचऱ्याची सफाई करणे. तसेच मुख्य रस्त्यालगत असलेले सर्व लहान गटार सफाई करण्या साठी स्वतंत्र ठेकेदार नियुक्त केले आहेत. ठेकेदारांच्या नाले सफाईच्या कामावर मुख्यालय स्तरावरुन नियंत्रण व दैनंदिन देखरेख करणेसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, सहायक आयुक्त, उपायुक्त, अतिरीक्त आयुक्त आणि स्वतः आयुक्त हे काम सुरू असताना कोणत्याही वेळी अचानक भेट देऊन कामाची पहाणी करतील अशी माहिती पालिकेच्यावतीने देण्यात आली आहे. कामा मध्ये दिरंगाई अथवा जाणीवपुर्वक हलगर्जी पणा आढळून आल्यास त्याचक्षणी ठेकेदारां विरोधात नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल त्यासोबत ठेकेदाराने त्यास ठरवुन दिलेल्या दैनंदिन उद्दिष्टाप्रमाणे काम करणे बंधनकारक असून,जर दैनंदिन उदिष्ट पुर्ण झाले नाही, तर त्यावर सुद्धा दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा आयुक्त अनमोल सागर यांनी दिला आहे. नालेसफाईचे काम करताना ठेकेदाराने सर्व सफाई कामगारांना सर्व सुरक्षा विषयक साधने पुरविणे आणि कामगारांनी ती वापरणे बंधनकारक असणार आहे.तर केलेल्या दैनंदिन कामाचे जिओ टॅग फोटो पालिका प्रशासनास सादर करणे ठेकेदारावर बंधनकारक असणार आहे. मंगळवारी रात्री झालेल्या पावसाने अनेक ठिकाणी पाणी तुंबून राहिले होते. त्यानंतर आयुक्त अनमोल सागर यांनी स्वतः शहरातील विविध नाल्यांच्या ठिकाणी भेट देत तेथे सुरू असलेल्या कामाची माहिती घेतली. यावेळी ठेकेदाराने कामचुकारपणा न करता सफाई कामगारांना सुरक्षा साहित्य देऊन काम करून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास पवार, सहाय्यक आयुक्त शैलेश दोंदे,आरोग्य विभागाचे फैजल तातली, जे एम सोनवणे उपस्थित होते.

# संत विचारच मानवाला लोभ मुक्त करतील

## ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी**

लोभापासून दूर राहणे हे मनुष्याच्या जीवनात खूप महत्वाचे आहे. लोभामुळे व्यक्ती दुःखी होतो त्याच्या विचारात नकारात्मकता येते आणि तो चांगल्या कामापासून दूर राहतो. अशावेळी संत विचारच मानवाला लोभ मुक्त करतात. यासाठी संतांनी दाखविलेल्या मार्गाचे सर्वांनी अनुकरण करावे. असे अनमोल विचार ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर यांनी व्यक्त केले. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे व समस्त गावकरी मंडळ, रामेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने संत श्री गोपाळबुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह व श्री संत तुकोबारायांचे जीवन चरित्र कथेचे आयोजन विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) येथे करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. तसेच त्यांनी काल्याचे किर्तन ही केले. यावेळी जगविख्यात संगणक शास्त्रज्ञ व नालंदा विद्यापीठाचे माजी कुलपती पद्मभूषण डॉ. विजय भटकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड होते. तसेच माईर्स एमआयटीचे



कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त आणि एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल वि. कराड, माईर्स एमआयटीचे अध्यक्ष डॉ. मंगेश तु.कराड, रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड, प्रगतीशील शेतकरी काशीराम दा. कराड, कमल राजेखाँ, सौ. उषा विश्वनाथ कराड, डॉ. सुचित्रा कराड नागरे व राजेश कराड हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एम. पठाण, प्रसिद्ध कवी डॉ. संजय उपाध्ये, गिरीश दाते व रामेश्वरच्या पंचक्रोशितील भाविक उपस्थित होते. ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर म्हणाले, लोभ हा मानवाचा सर्वात मोठा शत्रू असल्याने यापासून शक्य तितके दूर रहावे. लोभामुळेच जगामध्ये अशांततता पसरलेली आहे. अशावेळेस विश्वशांतीसाठी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांनी विश्वशांती ज्ञान ज्योती पेटविली आहे. ही ज्ञान ज्योत विश्व मानवता आणि बंधुत्वाचा विचार संयुक्त राष्ट्र संघापर्यंत पोहचवून संपूर्ण जगाला सांगणार आहे. प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड म्हणाले, रामेश्वर (रुई)चे नाव संपूर्ण जगभरात मानवतेचा व विश्वशांतीचा संदेश देणारे गाव म्हणून ओळखले जात आहे. त्याग आणि समर्पणाचे प्रतिक म्हणून याकडे पाहिले पाहिजे. सर्व धर्म ग्रंथ हे खरे जीवनग्रंथ आहेत. कसे जगावे आणि कसे जगू नये याची शिकवण आपल्याला देत आहेत. या वेळी रामेश्र्वरच्या पंचक्रोशितील भाविक भक्त आणि माता भगिनी मोठ्या संख्येने ...पान ६ वर

# जिल्हा कामगार न्यायालयाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार




**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्सच्या वतीने लातूर जिल्हा कामगार न्यायालयाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार नुकताच कामगार न्यायालयाच्या सभागृहात करण्यात आला. लातूर जिल्हा लेबर लॉ प्रॅक्टिशनरचे नवीन कार्यकारणी अध्यक्ष ॲड. गोपीनाथ पवार, सचिव ॲड. भगवान गवळी, उपाध्यक्ष अजिंक्य देशमुख, सहसचिव चैतन्य इटकरी, कोषाध्यक्ष ॲड.ज्योती जाधव यांचा सत्कार महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमन लॉयर्सच्या अध्यक्षा ॲड. जयश्री पाटील व सहकारी सदस्य ॲड.तृप्ती इटकरी, ॲड.वसुधा नाळापुरे, ॲड. अभिलाषा गवारे, ॲड.गायत्री नल्ले यांनी केला. यावेळी ॲड.जयश्री पाटील, न्यायाधीश राहुल भागवत, औद्योगिक न्यायालय लातूर आणि न्यायाधीश श्रीमती सोनाली मुकुंद औंधकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संघटनेची माहिती ॲड.पल्लवी कुलकर्णी यांनी दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ॲड.अरुणा वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमास ॲड.ए.बी.शेख, ॲड. नीलिमा पाटील, ॲड.अशोक काळे, ॲड.हरिश्चंद्र कवठेकर, ॲड. भगवान गवळी, ॲड. माजीद पटेल, ॲड.मनोज लांडगे, ॲड. नयना देवताळकर, ॲड.नारायण इटकरी, ॲड. तृष्णा काळे, ॲड.तुळशीराम धोंड, ॲड.सुरेखा शृंगारे, ॲड.रेश्मा सय्यद, ॲड. रेहाना तांबोळी, ॲड.सुप्रिया बिडवे यांची उपस्थिती होती.

# गडचिरोली लवकरच सर्वाधिक समृद्ध जिल्हा होईल–राज्यपाल राधाकृष्णन

**मुंबई/प्रतिनिधी**

युवकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व कौशल्य प्रदान केल्याशिवाय विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करता येणार नाही असे सांगून गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाने तेथील लॉइड स्टील कंपनी व पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या कर्टीन विद्यापीठासोबत केलेल्या करारामुळे विद्यापीठामधील शिक्षणाचा दर्जा उंचावून आगामी काळात गडचिरोली जिल्हा सर्वाधिक समृद्ध जिल्हा म्हणून उदयास येईल व जिल्ह्याचा चेहरामोहरा पालटेल, असे प्रतिपादन राज्यपाल तथा कुलपती सी पी राधाकृष्णन यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गोंडवाना विद्यापीठाचे लॉइड्स मेटल्स व एनर्जी तसेच पश्चिम ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठ यांच्यात राजभवन, मुंबई येथे सामंजस्य करार झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वामुळे गडचिरोली तसेच इतर नक्षल प्रभावित भागातील नक्षलवाद पूर्णपणे आटोक्यात आला. त्याच्या फलस्वरूप गडचिरोली येथे विकासाची पहाट होत आहे असे सांगून कोणताही विकास सर्वसमावेशक असल्याशिवाय अपूर्ण असल्याचे राज्यपालांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नक्षलवादाचा पूर्णपणे बिमोड करण्यासाठी यापुढे देखील



कठोर पावले उचलतील असा विश्वास राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला. काही महिन्यांपूर्वी आपण माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचेसह गडचिरोलीचा दौरा केला होता असे सांगून गोंडवाना विद्यापीठाने स्थानिक गरज विचारात घेऊन अभ्यासक्रम आखावे तसेच विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळतील हे पाहावे असे राज्यपालांनी सांगितले. गडचिरोली येथे विपुल खनिज संपदा असून तेथे उत्तम प्रतीचे लोहखनिज आहे. त्याठिकाणी आज धातू व खनिजाच्या शोधन व विनियोगासाठी तज्ज्ञ लोकांची आवश्यकता आहे असे सांगून कर्टीन विद्यापीठाशी सहकार्यामुळे खनिज क्षेत्रातील शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल असे राज्यपालांनी सांगितले. गोंडवाना विद्यापीठाने लॉईड्स स्टील व एनर्जीच्या सहकार्याने विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था स्थापन केल्याबद्दल राज्यपालांनी विद्यापीठाचे अभिनंदन केले.

**गडचिरोली देशातील 'स्टील हब' होईल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

खनिज व धातू क्षेत्रातील उद्योग स्थापन झाल्यामुळे आगामी पाच वर्षामध्ये गडचिरोली जिल्हा देशातील स्टील निर्मितीचे मोठे केंद्र होईल व जिल्ह्याचे मागासलेपण इतिहासजमा होईल असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. खनिज व ...पान ६ वर

# भिवंडीतील अंजुरफाटा काल्हेर रस्त्याची दुरावस्था; खासदार सुरेश म्हात्रेंकडून पाहणी

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील अंजुर फाटा काल्हेर ठाणे रस्त्याची सध्या प्रचंड दुरावस्था झाली असून या महामार्गा कडे सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीए व मेट्रो प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने या महामार्गावर अनेक ठिकाणी खड्डे तसेच गटार व्यवस्थापन नसल्याने गटारातील पाणी रस्त्यावर साचल्याने वाहन



चालकांसह स्थानिक नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.नागरिकांची समस्या लक्षात घेता भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी शुक्रवारी या महामार्गाची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात रस्त्यावर काल्हेर, पूर्णा, हॉली मेरी स्कुल अंजुर फाटा परिसरात रस्त्याच्या बाजूला गटार व्यवस्थापन नसल्याने व जुने नाल्यांचे प्रवाह बांधकाम व्यवसायिकांनी बंद केल्याने या महामार्गावर पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही व गटारीचे पाणी थेट रस्त्यावर येत असल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे खासदार बाळ्या मामा यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह, एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनात आणून देत, या महामार्गावरील गटाराचे व्यवस्थापन व रस्त्याच्या दुरावस्थे संदर्भात दखल घेऊन प्रलंबित कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याचे लेखी स्वरूपात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यां कडून खासदार बाळ्या मामा यांनी लिहून घेतले आहे. अंजुर फाटा काल्हेर रस्त्याची दुरावस्था झाली असून या दुरावस्थेला सर्वस्वी सार्वजनिक बांधकाम विभाग एमएमआरडीए व मेट्रो प्रकल्पाचे अधिकारी जबाबदार असून एकमेकां वर जबाबदारी ढकलण्याचा त्यांच्या दुर्लक्षित कारभारामुळे रस्त्याची दुरावस्था झाली आहे. अधिकाऱ्यांची काम करण्याची मानसिकता नसल्याने प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याच्या दुरावस्तेकडे व गटार व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष झाले तर भविष्यात पावसाळ्यात चार महिने रस्ता बंद करण्याची वेळ येण्याची शक्यता असून आजच्या पाहणी दौऱ्यात दर्शविलेल्या कामांच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी आपण करणार असा इशारा यावेळी खासदार बाळ्या मामा यांनी दिला आहे.

# आमदार विक्रम काळे यांना 'मराठवाडा आयकॉन' पुरस्कार



**लातूर/प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार विक्रम काळे यांना 'नवभारत'च्यावतीने 'मराठवाडा आयकॉन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते शाल, फेटा व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत, अहमदपूरचे गटविकास अधिकारी संतोष माने, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, डॉ. गणेश नागरगोजे, राजीव मुंढे, छत्रपती संभाजीनगर राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला शहराध्यक्षा प्रणिता सूर्यवंशी, प्रा. अंकुश नाडे, गंगाधर आरडले, राजकुमार जाधव, बाबासाहेब भिसे, राजकुमार मगर, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते आदी उपस्थित होते.